गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १८.०१.२०२५ | अंक नं. २६९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# डीएसपी चौक ते तारकपूर रस्त्यावर दररोज होतेय वाहतुकीची मोठी कोंडी

## रस्त्याचे काम करताना पर्यायी व्यवस्था न केल्याने एसटी वाहकांनाच करावे लागते वाहतूक नियंत्रणाचे काम

नगर - डीएसपी चौक ते तारकपूर रस्त्यांचे काम सुरू झाले. मात्र पर्यायी रस्त्यांची व्यवस्था करण्यात आलेली नाही. या भागातील तारकपूर एसटी आगारात सर्व बसेस दिवसभर ये-जा करत असतात. बसस्थानकातून बसेसना बाहेर पडताना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. शनिवारी (दि. १८) सकाळपासूनच या रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.



शनिवारी सकाळी तारकपूर स्टॅन्ड मधील बसेस बाहेर काढताना एसटी वाहकांना ट्रॅफिक पोलिसांची भूमिका पार पाडावी लागली. (छाया - विजय मते)

या वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिकेला मोठा फटका बसत आहे. याच रस्त्यांवर मोठ-मोठे हॉस्पिटल असल्याने रुग्णांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागत आहे. शनिवारी (दि. १८) सकाळी नऊच्या सुमारास दोन्ही बाजूंनी वाहनांची गर्दी झाली होती. एसटी आगारातून बाहेर काढताना चालकांना मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे एसटी वाहकांनाच ट्रॅफिक पोलिसांचे काम करीत आगारातील एसटी बाहेर काढावी लागते.

तारकपूर भागातील रस्त्यांची कामे सुरू करण्यापूर्वी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देणे ही जबाबदारी बांधकाम विभागाने पार पाडली नसल्याने वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न या मार्गावर निर्माण झाला आहे. रस्त्यांची कामे पूर्ण होईपर्यंत एकरी वाहतूक करता येईल का याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. डीएसपी चौकात सिग्नल जवळ तीन ते चार पोलीस एकाच वेळी उभे असतात त्या ऐवजी त्यांना तारकपूर एसटी स्टँड समोर वाहतूक सुरळीत करण्यासाठी थांबविले तर काही प्रमाणात एसटी बसेस चालकांना दिलासा मिळेल. वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, अशी मागणी वाहन चालक करीत आहे.

आता साऊथ इंडियन डिशेस सुद्धा...
स. ७ ते संध्या. ७ वाजेपर्यंत
Saffron Pure Veg Delight Rooftop Restaurant.
SAIDEEP EXECUTIVE
हॉटेल साईदीप एक्झिक्युटिव्ह, कोहिनूर मॉलसमोर, नगर-मनमाड रोड, अ.नगर.
70 304 80 304

दुकान भाड्याने देणे आहे
नवीपेठ मध्ये पोखरणा ज्वेलर्स शेजारी 300 स्क्वे.फू. दुकान भाड्याने देणे आहे
Mo. 7350012310 / 8888965980

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

PRATHMESH LAMINATES THE LAMINATE GALLERY
२३ वा वर्धापन दिन...
अहमदनगर जिल्ह्यातील प्लायवूड, हार्डवेअर डिलर्स, आर्किटेक्ट्स, इंटेरिअर डिझायनर्स, इंजिनिअर्स, कारपेंटर्स तसेच असंख्य ग्राहक व हितचिंतकांचे आम्ही मनापासून आभारी आहोत.
आपणच आहात आमच्या यशस्वी वाटचालीचे खरे शिल्पकार !
आपणा सर्वांचे आभारी आहोत...
विनित
राकेश कांतीलाल गांधी
विकास कांतीलाल गांधी । प्रथमेश लॅमिनेट्स सर्व टिम
GREENPANEL EURO PRATIK Right Kitchen GALGO REHAU FALCOFIX Stago BRAVIO GLORIO
Exclusive Laminates / Exclusive Veneers / Kitchen Trolley Highlighter / Wallpapers / Wooden Flooring
शॉप नं. २, अस्मि प्लाझा, हॉटेल राज पॅलेसमागे, टिळक रोड, अहिल्यानगर.
Tel. : 0241-2472007 / 2470560 / Mob. : 9689812121
गोडाऊन : पटेल लाईटच्या शेजारी, स्वस्तिक चौक, अहिल्यानगर. Tel. (0241) 2325164 | 8999267007

अहिल्यानगरमधील सुवर्णदालनासाठी
पाहिजेत
• अकौंटट जागा 4
• कॅशिअर जागा 4
• सेल्समन जागा 10
• सेल्सगर्ल जागा 10
• हेल्पर जागा 5
आकर्षक पगार आणि इन्सेन्टिव्ह । अनुभवीस प्राधान्य
इच्छुक उमेदवारांनी अर्जासह समक्ष भेटावे
A.H. पोखरणा ज्वेलर्स
साईदीप टॉवर, सर्जेपुरा, अ.नगर
सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अ.नगर

यशवंतराव चव्हाण मेमोरियल मेडिकल ॲण्ड रुरल डेव्हलमेंट फौंडेशनचे,
दंत महाविद्यालय व रुग्णालय, अहमदनगर
फोन नं. ७७२००१३३१७, ७३५०१७५३२०
ई-मेल yash_dental@rediffmail.com
खालील जागा त्वरित भरणे आहे.
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२ पदे
(अर्हता- कोणत्याही शाखेतील पदवी व पदाचा अनुभव)
टिप :- पात्र व इच्छुक उमेदवारांनी सर्व शैक्षणिक कागदपत्र व वेतन इ. अपेक्षेसह महाविद्यालय कार्यालयात आठ (०८) दिवसांत अर्ज करावेत.
अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण मेमोरियल मेडिकल ॲण्ड रुरल डेव्हलमेंट फौंडेशन, अहमदनगर

जय आत्म । जय आनंद । जय देवेंद्र । जय शिव । जय महेंद्र ।
परमभाग्य है हमारा.. आचार्यश्री के लाडले युवाचार्यश्री आपके मंगल आगमनपर, उत्सुक है नगर सारा...
राष्ट्रसंत आचार्य पूज्य श्री आनंदऋषिजी म.सा. इनके लाडले सुशिष्य
युवाचार्यश्री प्रवर पुज्य श्री. महेंद्रऋषिजी म.सा.
हितमित भाषी पू. श्री. हितेंद्रऋषिजी म.सा. पू. श्री. धवलऋषिजी म.सा. आदिठाणा ३
इनका आनंदधाम की पावनपुण्यभुमिपर आगमन !
सोमवार दि. २० जानेवारी २०२५,
सुबह ८.०० बजे आनंदऋषिजी हॉस्पिटल के पास उनका प्रथम स्वागत वहाँसे जुलुस के साथ आनंदधाम में
भव्य स्वागत !
विशेष सन्मान : १४ फरवरी २०२५ को वडगांव मावल, जि. पुणे यहाँ होनेवाले दिक्षा के दिक्षार्थी शिवम संदीपजी बाफना
इनका अहिल्यानगर श्रीसंघ की तरफसे इस पावन अवसरपर विशेष सन्मान ।
युवाचार्य श्री का स्वागत एवम् दिक्षार्थी के सन्मान कार्यक्रम के मंगल अवसरपर सभी श्रावक-श्राविका उपस्थित रहे।
स्वागतोत्सुक
श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ
आनंदधाम, अहिल्यानगर

गरजा अनेक सोल्युशन फक्त एकच
Finolex Pipes & Fitings
Long Lasting Pipes
पिढीया बदलेंगी पाईप नही...
अधिकृत विक्रेते!
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## नव्या युगातील नवा भारत

मजबूत लोकशाहीसाठी प्रदीर्घ काळापासून ओळखला जाणारा भारत आता जागतिक आर्थिक व उत्पादन शक्ती केंद्र म्हणून उदयास येत आहे. आपण 'विकसित भारत–२०४७' चे उद्दिष्ट ठेवून मार्गक्रमण करत आहोत.

पुढील २५ वर्षात, भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न ४ ट्रिलीयन डॉलरवरून ३० ट्रिलीयन डॉलरपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. या प्रवासात देशातील तरुणांना येत्या काही वर्षात अनेक संधी वाट्याला येतील. पण केवळ 'जगात फॅक्टरी' बनणे परवडणारे नाही. एक 'इनोव्हेशन ड्रिव्हन इकॉनॉमी' म्हणून उदयास येणे आवश्यक आहे.

दीर्घकाळापासून आपण आयातीवर अवलंबून होतो व आजही मोठ्या प्रमाणात आहोत. त्यामुळे इनोव्हेशन, संशोधन, विकास यावर प्रचंड भर देण्याची गरज आहे. तरुणाईच्या प्रतिभेवर जोर द्यावा लागेल. स्टार्टअप, विविध क्षेत्रात ही तरुणाई अकल्पित अन् आश्चर्यकारक गोष्टी करत आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

सेमीकंडक्टर, अक्षय्य उर्जा, संरक्षण उत्पादने, लहान मॉड्युलरमधील गुंतवणूक यासारख्या क्षेत्रात देश वेगाने पुढे जात आहे. २०३० पर्यंत भारतीय कंपन्या २० दशलक्ष रोबोंची निर्मिती करणार आहे. आर्टिफिशीअल इंटेलिजन्सच्या क्षेत्राचे नेतृत्व उद्याच्या भविष्यात आपला भारत करेल. तात्पर्य आर्थिक वाढ, परराष्ट्र संबंध व मुत्सद्देगिरी, व्यवसाय उद्योगांच्या संधी, विज्ञान, तंत्रज्ञान, नवोपक्रम, आरोग्य सेवा इ. क्षेत्रात नव्या युगाचा नवा भारत सक्षम, भक्कम आहे.



# तपोवन रोडवर घरातून चोरी, रोकड व दागिन्यांसह ३ लाखांचा ऐवज लंपास

नगर – आजारी असलेल्या नातेवाईकाला भेटण्यासाठी कर्जत येथे गेलेल्या कुटुंबाचे घर चोरट्यांनी फोडून रोकडसह सोन्याचे दागिने असा ३ लाख ६ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना शहरातील तपोवन रोडवर दक्षतानगर परिसरात १६ जानेवारीला सकाळी ९ ते १७ जानेवारीच्या दुपारी १२ वाजेपर्यंतच्या कालावधीत घडली.

याबाबत सौ. आरती ज्ञानेश्वर महाडीक (रा. स्वप्नपुर्ती बंगला, दक्षतानगर, तपोवन रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे दिर बाळासाहेब महाडीक हे आजारी असल्याने त्या व त्यांचे कुटुंबीय घराला कुलूप लावून १६ जानेवारीला सकाळी ८ च्या सुमारास कर्जतला गेल्या होत्या. त्यांना भेटल्यानंतर ते त्यांच्या मुळ गावी कुळधरण येथे मुक्कामी थांबले. १७ जानेवारीला दुपारी १ च्या सुमारास ते नगरमधील त्यांच्या घरी परतले असता त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. तसेच दरवाजा उघडा व हॉलमधील खिडकीचे गज तुटलेले दिसले.

त्यांनी घरात पाहणी केली असता सर्वत्र उचकापाचक केल्याचे दिसून आले. अज्ञात चोरट्याने चोरीच्या उद्देशाने ही उचकापाचक केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी बेडरूममधील कपाटाची पाहणी केली असता त्यात ठेवलेले ८० हजारांची रोकड, सुमारे ४ तोळे वजनाचे सोन्याचे विविध प्रकारचे दागिने, चांदीचे दागिने असा ३ लाख ६ हजारांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेल्याचे समोर आले. त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत नगरमध्ये जनजागृती रॅली

नगर – शहर वाहतूक नियंत्रण शाखेमार्फत रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांची वाहतूक नियमांबाबत जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. तसेच, प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. ११ जानेवारी ते १७ जानेवारी दरम्यान विविध उपक्रम राबवण्यात आले.



शहर वाहतूक नियंत्रण शाखेमार्फत रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांची वाहतूक नियमांबाबत शहरात काढण्यात आलेली जनजागृतीपर रॅली.

शहरातील अहमदनगर कॉलेज, न्यू आर्टस् कॉलेज, पेमराज सारडा महाविद्यालय, समर्थ विद्यालय, मेहर इंग्लिश स्कूल, आनंद विद्यालय, जय बजरंग विद्यालय येथील विद्यार्थ्यांची जनजागृती पर रॅली कोठी चौक, चांदनी चौक, नीलक्रांती चौक, दिल्लीगेट, पटवर्धन चौक, चितळेरोड, गांधी मैदान, गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड या परीसरात काढण्यात आली. विद्यार्थ्यांना माहितीदर्शक फलके वाटप करुन वाहन चालकांनी हेल्मेट वापरणे, वाहन चालवताना मोबाईलवर न बोलने, सिटबेल्टचा वापर करणे तसेच अपघातातील जखमींना तातडीने करावयाच्या प्राथमिक उपचारांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. अपघातग्रस्तांसाठी असलेल्या रुग्णवाहिका, पोलिसांच्या कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली. या रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमात जवळपास अडीच हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या वाहनचालकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना गुलाबपुष्प देण्यात आले. माळीवाडा व तारकपूर बस स्थानक परीसरात नाकाबंदी दम्यान ज्यांनी वाहन चालवताना हेल्मेटचा व सिटबेल्टचा वापर केला, त्यांना गुलाब पुष्प देवून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# नियंत्रित वेग, सीटबेल्ट व हेल्मेटच्या वापरामुळे जीवितहानी टळू शकते

## वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांचे प्रतिपादन, रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम

नगर – महामार्गावर वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवल्यास तसेच सिटबेल्ट व हेल्मेटचा वापर केल्यास जीवितहानी टळू शकते, असे प्रतिपादन शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी केले.



रस्ता सुरक्षा अभियान २०२५ – निमित्त हेल्मेटचा स्वयंप्रेरणेने वापर करणाऱ्या दुचाकी वाहन चालकांना गुलाब पुष्प व प्रबोधनात्मक घोषवाक्य असलेले नववर्ष पॉकेट कॅलेंडर देऊन प्रोत्साहित करतांना शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे.

भारत सरकार सडक परिवहन मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती कार्यक्रमांतर्गत स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फाऊंडेशनच्या वतीने स्वयंप्रेरणेने सिटबेल्ट व हेल्मेटचा वापर करणाऱ्या वाहन चालकांना श्री. बोरसे यांचे हस्ते गुलाब पुष्प व प्रबोधनात्मक घोषवाक्य असलेले नववर्षाचे पॉकेट कॅलेंडर देऊन त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते

बोरसे पुढे म्हणाले की, रस्ते अपघात कमी करण्यासाठी तसेच रहदारीच्या नियमांबाबत जनतेमध्ये जागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशानुसार राज्य रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते. यावर्षीही शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार १ ते ३१ जानेवारी या संपूर्ण महिन्याभरात काळजी ही थीम / संकल्पना वापरून जिल्ह्यात रस्ता सुरक्षा अभियान २०२५ राबविण्यात येत आहे.

महामार्गावर वेगमर्यादा पाळा ! अपघात टाळा!! , सीट बेल्टचा वापर – नियंत्रित गती!! आपली सुरक्षा आपल्याच हाती!! , वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे टाळा! अपघातांना बसेल आळा!! , वापरा शिरस्त्राण ! वाचतील प्राण!! अशा घोषवाक्यांद्वारे वाहनचालकांचे प्रबोधन करण्यात आले.

यावेळी शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अण्णासाहेब परदेशी, शमूवेल गायकवाड, फाऊंडेशनचे अभय ललवाणी, महावीर ललवाणी, उल्हास नांगरे, ऋषिकेश ललवाणी, पो. हे. कॉ. सोपान गिऱ्हे, बाळासाहेब ढोरमारे, अमोल घुगे, राजू गव्हाणे, रामकुमार सूर्यवंशी, मधूकर ससे, राहूल काळे, चालक अतुल लगड उपस्थित होते.




वाहतूक सप्ताह निमित्त अहमदनगर कॉलेजच्या एनसीसी विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर काढलेली रॅली.

# वाहतूक सप्ताह निमित्त अहमदनगर कॉलेजच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांची जनजागृतीपर रॅली

नगर – शहर वाहतुक नियंत्रण शाखा, अहिल्यानगर कडून रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत १५ जानेवारीला अहमदनगर कॉलेजच्या एनसीसी विद्यार्थ्यांची जनजागृती पर रॅली कोटी चौक, चांदनी चौक, अशी आयोजित करण्यात आली. तसेच न्यु आर्टस् कॉलेजच्या विद्यार्थ्यांची जनजागृती पर रॅली न्यु आर्टस् कॉलेज, नीलक्रांती चौक, दिल्लीगेट अशी आयोजित करण्यात आली. दोन्ही कॉलेजच्या विद्यार्थ्यांना माहितीदर्शक फलके वाटप करुन वाहन चालकांनी हेल्मेट वापरणे, वाहन चालवताना मोबाईलवर न बोलने, सिटबेल्टचा वापर करणेबाबत प्रबोधन केले. तसेच ज्यांनी वाहन चालवताना हेल्मेटचा व सिटबेल्टचा वापर केला आहे त्यांना गुलाब पुष्प देवून अभिनंदन केले. तसेच पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे सो. यांनी शलेय विद्यार्थ्यांना वाहतुक नियमांबाबत मार्गदर्शन करुन आपले परिवारातील सदस्यांना वाहतुक नियम पाळणेबाबत सांगण्यात यावे असे कळविण्यात आले आहे.

कार्यक्रमाप्रसंगी शहर वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, पोसई घायतडक, पोसई बोठे, पोसई गायकवाड, सफौ. मन्सुर सय्यद पोहवा. कर्डीले व पो.कॉ. ससे उपस्थित होते.

# टेम्पोच्या धडकेत जखमी दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर – मार्केटयार्ड येथून मोपेड दुचाकीवरून पाईपलाईन रोड येथे जाणाऱ्या मोपेडस्वारास पाठीमागून भरधाव वेगातील टेम्पोने धडक दिली. या धडकेत मोपेड स्वार गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरिता रुग्णालयात नेले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही घटना नगर संभाजीनगर रोडवरील टॉपअप पेट्रोलपंपमागे ममता स्वीट समोर ७ जानेवारीस घडली. या प्रकरणी टेम्पोचालकावर १७ जानेवारीला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतची माहिती अशी की भाऊसाहेब रामा बोंद्रे (वय ४६, रा. बरबडेवस्ती, पाईपलाईन रोड) हे ७ जानेवारी रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास मार्केटयार्ड येथून त्यांचे होंडा ॲक्टीवा मोपेडवर (क्र. एम एच १६ बी एक्स ९५२३) नगरकडुन छत्रपती संभाजीनगर रोडने टॉपअप पेट्रोलपंपमागे ममता स्वीट समोरुन जात असताना पाठीमागुन येणाऱ्या आयशर टेम्पोने (क्र.एम. एच १४ जे एल ४५०७) मोपेडला पाठीमागुन जोराची धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघात होताच टेम्पोचालक गर्दीचा फायदा घेऊन टेम्पो तेथेच सोडून कोठेतरी निघुन गेला. जखमी भाऊसाहेब बोंद्रे यांस नागरिकांनी सिव्हील हॉस्पीटल येथे नेले. तेथे त्याच्यावर उपचार सुरु असताना वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना उपचारादरम्यान मयत झाल्याचे घोषीत केले.

या प्रकरणी मयत बोंद्रे यांचे मेव्हणे प्रमोद शिवाजी लिपणे (रा. पाईपलाईन हडको) यांनी १७ जानेवारीला दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अनोळखी टेम्पोचालका विरुध्द अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.



## राष्ट्रवादी अहिल्यानगर जिल्हा सचिवपदी सचिन डेरे यांची नियुक्ती

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मान्यतेने अहिल्यानगर जिल्हा सचिवपदी सचिन डेरे यांची नियुक्ती करण्यात आले आहे. नियुक्तीपत्र देताना माजी आमदार अरुण जगताप, आ. संग्राम जगताप, आ. काशिनाथ दाते सर, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत व जिल्हा कार्यकारणी उपस्थित होते. (छाया– लहू दळवी)

## गजराजनगर परिसरातून ३६ वर्षीय महिला बेपत्ता

नगर – एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या गजराज नगर येथून ३६ वर्षीय भोळसर महिला २ जानेवारीपासून घरातून बेपत्ता झाली आहे. ती अद्याप घरी परतली नाही. तिच्या घरच्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला असता की कोठेही मिळून आली नाही. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली. अधिक तपास पोलीस हवालदार अनिल आव्हाड हे करीत आहे. सदर बेपत्ता महिलेचे नाव रेखा बुद्धसिंग चोतोडीया, वर्ण गोरा, नाक सरळ, कान बारीक, डोळे काळे, चेहरा गोल, केस लांब काळे, शरीराने मध्यम, उंची पाच फूट, अंगात गुलाबी रंगाचा टॉप, गुलाबी रंगाची लेगिन्स, गळ्यात मोती काचेची माळ आहे. सदर महिला कोणास आढळल्यास त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे फोन ०२४१ – २४१६१२३ यावर संपर्क करावा.



अभिनेता मकरंद अनासपुरे व अभिनेत्री निर्मिती सावंत यांचा सन्मान करताना स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे.

## माधुरीबाई रानडे यांचे वृद्धापकाळाने निधन


नगर – गुलमोहररोड, कोहिनूर मंगल कार्यालयामागे राहणाऱ्या श्रीमती माधुरीबाई मुकुंद रानडे (वय ८५) यांचे १७ जानेवारी रोजी निधन झाले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, नातसुन असा परिवार आहे. त्या धार्मिक स्वभावाच्या, मनमिळावू आणि सामाजिक कामात अग्रेसर होत्या. मनोहर, विनायक रानडे यांच्या त्या मातोश्री होत.

## प्रेमराज दुग्गड यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील प्रेमराज घेवरचंद दुग्गड (वय ८२, रा.घोडनदी, शिरुर) यांचे १७ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर घोडनदी शिरुर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुमतीलाल व वालचंद दुग्गड तसेच वर्षा अभय बाफना (रा. जामखेड) व राणी राजेंद्र चोरडीया (रा.वरळीकांचन) यांचे ते वडील होत.

## श्रीमती ताराबाई पांडे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – येथील श्रीमती ताराबाई रायचंद पांडे (वय ८५) यांचे १७ जानेवारी रोजी दुपारी २:३० वा. वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, दिर, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. धनालाल हिरालाल पांडे यांच्या भावजई, राजेंद्र पांडे यांच्या मातोश्री, सिद्धार्थ पांडे यांच्या आजी, महेंद्र व निलेश पांडे यांच्या चुलती होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# तिरंगा सन्मान मोहिमेची दखल घेत मनपा प्रशासनाकडून परिपत्रक जारी

नगर – अनेक वर्षांपासून मी राबवत असलेली तिरंगा सन्मान मोहीम शासन, प्रशासनाकडून राबवली जाईल अशी माझी अपेक्षा होती, यासाठी मी अनेक वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा करत आहे. याबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर, मनपा आयुक्त अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी छावणी परिषद भिंगार यांना निवेदनाद्वारे तिरंगा सन्मान मोहीम राबविण्याची विनंती केली. या विनंतीची दखल घेऊन अहमदनगर जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना राष्ट्रध्वजाचा सन्मान करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच मनपा जिल्हा प्रशासनाकडून तत्काळ दाखल घेऊन याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले. या मोहिमेत अहिल्यानगर मनपा कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थ्यांना वर्षभर जेथे राष्ट्रध्वज पडलेले निदर्शनात येतील ते सन्मानपूर्वक जमा करून कार्यालयात जमा करण्याच्या सूचना / आवाहन देण्यात आलेल्या आहे. सिस्टीम मॅनेजर यांना अहिल्यानगर महापालिकेच्या वेबसाईटवर महापालिका हद्दीतील सर्व नागरिकांना राष्ट्रध्वज दिसतील ते जमा करण्याचे आवाहन करण्यात आले, प्रसिद्धी अधिकारी यांना २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे आणि वर्षभर जेथे कोठे राष्ट्रध्वज दिसतील ते जमा करण्याबाबत शहरातील सर्व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध करून नागरिकांना आवाहन करण्यात यावे असे सूचना दिल्या तसेच सोशल मीडिया उदाहरणार्थ फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर इत्यादींवर नागरिकांना वरील प्रमाणे आवाहन करण्यात यावे अशी सूचना दिली.

सदर परिपत्रकाची कार्यवाही करण्याचे आदेश सर्व खातेप्रमुख व शाखाप्रमुख, सहाय्यक आयुक्त तथा घनकचरा विभाग प्रमुख, प्रशासनाधिकारी मनपा शिक्षण, विभाग सिस्टीम मॅनेजर, प्रसिद्धी अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तिरंगा सन्मान मोहीम राबविण्याचे निवेदन घेऊन सहाय्यक आयुक्त मेहर लहारे यांची भेट घेतली. त्यांनी तिरंगा सन्मान मोहिमेची स्तुती करून तात्काळ परिपत्रक काढण्याचे आदेश संबंधित कर्मचाऱ्यांना दिले. तिरंगा सन्मान मोहिमेमुळे नागरीक, कर्मचारी, विद्यार्थी. यांच्यात राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय प्रतीकांची माहिती, राष्ट्रभक्ती राष्ट्रभावना, नवचेतना वृद्धिंगत होऊन देश सेवेची आवड निर्माण होईल तसेच तिरंगा सन्मान मोहीम हा उपक्रम राज्यासाठीच नव्हे तर देशासाठी ही नवोपक्रम ठरेल असा आशावाद आहे. मनपा प्रशासनाने घेतलेल्या निर्णयापासून बोध घेऊन इतर शासकीय कार्यालयांतूनही तिरंगा सन्मान मोहीम राबवली जाईल अशी अपेक्षा शेख शहाजहान फकीर यांनी व्यक्त केली आहे.

## रामभाऊ पालवे यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर – कोल्हार (कोल्हुबाई) येथील शेतकरी रामभाऊ सावळेराम पालवे (वय ८२) यांचे १७ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा,१ मुलगी, जावई, सूना, नातवंडे असा परिवार आहे. म्हातारदेव पालवे यांचे वडील व बांधकाम व्यावसायिक इंजि.यश पालवे यांचे ते आजोबा होत. त्यांच्या पार्थिवावर कोल्हार येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय सहकार परिषद नियोजनार्थ २० जानेवारीला अहिल्यानगर येथे बैठक

नगर – सहकार खाते व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांनी संयुक्त विद्यमसाने आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५ शिर्डी, जि. अहिल्यानगर येथे ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. संयुक्त राष्ट्र संघटना (युनो) यांनी २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष घोषित केलेले आहे.

सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने नियोजनासाठी पुर्व आढावा बैठक २० जानेवारी रोजी वेळ दु. ४ वाजता डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हॉल, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अ.नगर यांच्या शेजारील हॉलमध्ये होणार आहे. सदर बैठक जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गणेश पुरी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. सदर बैठकीस महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयट व नाशिक विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा तसेच फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे अध्यक्ष सुरेश वाबळे व अहिल्यानगर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सबाजीराव गायकवाड, अहिल्यानगर तालुका फेडरेशनचे अध्यक्ष किसनराव लोटके यांच्या उपस्थितीत होणार आहे. अहिल्यानगर शहर तसेच तालुका कार्यालयाच्या कार्यक्षेतील सर्व नागरी/ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे चेअरमन व्यवस्थापक व पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे.

# सिव्हिल हॉस्पिटल परिसरात चोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या संशयितास पकडले

नगर – रात्रीच्या वेळी अंधारात काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या वावरणाऱ्या एकास तोफखाना पोलिसांनी पकडले. ही कारवाई सिव्हिल हॉस्पिटल परिसरात केली.

याबाबतची माहिती अशी की तोफखाना पोलीस रात्रीच्या वेळी सावेडी परिसरात पेट्रोलिंग गस्त करीत असताना सिव्हिल हॉस्पिटल परिसरात एक इसम संशयितरित्या वावरताना आढळून आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव रवी ज्ञानदेव वाल्हेकर (रा. भुतकरवाडी, सावेडी) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. यावरून पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी पोलीस अंमलदार सौरभ त्रिमुखे यांनी दिलेले फिर्यादीवरून रवी वाल्हेकर यांच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा अधिनियम १९५१ चे कलम १२२ अन्वये गुन्ह्याची नोंद केली.

# श्री संदीपनी अकॅडमीतर्फे रविवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

## गुणवंत विद्यार्थ्यांना दिली जाणार शिष्यवृत्ती

नगर – शहरातील श्री संदीपनी अकॅडमीच्या वतीने रविवारी (१९ जानेवारी) जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचे सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नगर–मनमाड रोड येथील संजोग लॉन्स येथे सकाळी १० वाजता या कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे.

१० वी उत्तीर्ण होऊन ११ वी मध्ये जाणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी खास एका बॉलीवूड अभिनेत्या आमंत्रित करण्यात आले असून, आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान होणार आहे. यावेळी आध्यात्मिक नेते ह.गु. गिरिवरधारी दास, माजी नगरसेवक निखिल वारे, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते प्रा. सुनील पंडित आदीं उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी विशेष सरप्राईज लॉंच करण्यात येणार आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### खजूर खा ऊर्जावान रहा

जर तुम्ही तुमच्या नाश्त्यात भिजवलेल्या खजूरांचा समावेश केला तर तुमच्या आरोग्याला अनेक प्रकारे फायदा होऊ शकतो. भिजवलेल्या खजूरमध्ये नैसर्गिक साखर असते जी शरीराला त्वरित ऊर्जा प्रदान करते. सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेल्या खजूर खाल्ल्याने तुम्हाला दिवसभर ऊर्जावान वाटेल. यामध्ये फायबर असते जे पाचनही सुधारते.

## पाककला

### गुळाची पोळी

**साहित्य** : अर्धा किलो गुळ (चिकीचा गुळ नसावा), तिळाची पूड अर्धी वाटी, डाळीचे पीठ अर्धी वाटी, १० वेलदोडे, तेल अर्धी वाटी, कणिक, तेलाचे मोहन पाव वाटी

**कृती** : तीळ स्वच्छ करुन भाजून गार करून बारीक कुटून तयार करा. वेलदोड्याची पूड तयार करा. गुळ किसून घ्या. त्यात भाजलेले डाळीचे पीठ, तिळाची पूड, वेलदोडा पूड घालून मिश्रण एकजीव करा. कणिक चाळून घ्या. त्यात तेलाचे मोहन घालून घट्ट भिजून घ्या. तेलाच्या हाताने मळून ठेवा. कणकेचे दोन गोळे घ्या. एका गोळ्याच्या आकाराप्रमाणे गुळ घ्या. तिन्ही पाऱ्या जरा जरा लाटून पहिल्या पारीवर गुळाची पारी नंतर पुन्हा कणकेची पारी ठेवा. किंचित कडे दाबून पातळ पोळी लाटा व खमंग भाजून घ्या.

## सल्ला

### बटाट्याचे कीस कसा बनवावा?

बटाट्याचा कीस करण्यासाठी बटाटे आदल्या दिवशी रात्री उकडावेत. थोडे गार झाल्यावर त्यांची साले काढून, सोललेले बटाटे फ्रीजमध्ये ठेवून द्यावेत, म्हणजे सकाळपर्यंत बटाटे थंड झाल्यामुळे कडक होतात व कीस चांगला सुलभ रीतीने पडतो. बटाट्याचा गोळा होत नाही.

## वास्तू

प्लॉटच्या चारही बाजूंना खोल्या व मधला भाग मोकळा आणि बरोबर तुळशी वृंदावनाची रचना असावयास हवी.

## सौंदर्य

खालच्या पापण्यांना मस्करा काळजीपूर्वक लावावा. डोळ्यांखाली त्वचेवर लागणार नाही, याची काळजी घ्यावी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १९ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, उत्तरा १७।३०, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : अडकलेला पैसा मिळेल. बुद्धिजीवींसाठी शुभ. गैरसमज दूर होतील.

**वृषभ** : आपल्या विवेक बुद्धिच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते. नियंत्रण सुटेल.

**मिथुन** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. व्यापारात वृद्धि होईल.

**कर्क** : कोणतेच काम अशक्य वाटणार नाही. मित्रांचा सहयोग मिळेल. मागील उधारी वसुल होईल.

**सिंह** : कामाला वाव मिळेल. आपले निर्णय, विचार दुसऱ्यांवर थोपू नका.

**कन्या** : लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**तूळ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. नवीन कल्पना सुचतील.

**वृश्चिक** : आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल.

**धनु** : व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल.

**मकर** : नवीन कार्य सुरू करू कराल.भाऊबंद डोके वर काढतील. यशाचा लपंडाव पहावयास मिळेल.

**कुंभ** : अनपेक्षित फायदा करून देणाऱ्या काही घटना घडतील. वेळेचे महत्व समजेल. घरात मंगल कार्य होतील.

**मीन** : आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहाल. व्यापारात नवीन करार होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### संकेत

एक बाई दुकानदाराकडे हिरवी लिपस्टिक मागत होती. दुकानदार म्हणाला– बाई हिरवी लिपस्टिक वाईट दिसते. हिरवीच तुम्हाला का हवी आहे. ? बाई म्हणाली, माझा प्रियकर रेल्वेत गार्ड आहे ना!

# जागतिक आश्चर्ये


### डेव्हीडचा पुतळा

जगप्रसिद्ध चित्रकार मायकल अँजेलो याने हा डेव्हीडचा पुतळा बनविला होता. बायबलमध्ये डेव्हीडच्या व्यक्तीरेखेचा उल्लेख केला गेलेला आहे. या पुतळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे मानवामध्ये असलेले सौंदर्य, शक्ती व संकटास कसे सामोरे जायचे हे गुण दर्शविण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९५

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७०९४ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) जिज्ञासू; शोधक ४) आराधना; पूजा ७) जीभ; रसना; जिव्हा ९) गणेश; गणपती; गणनायक १२) माळा; एका झाडाचे पेय १३) महाराष्ट्रातील एक जिल्हा १५) रोजचा थोडा थोडा पाठ १६) चैतन्य; शुद्धी; अंत:करणाची जागृत स्थिती; स्मृती १७) चिखल; होळीची खाच १८) थंड; गार; भाताचा प्रत्येक दाणा २०) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक २२) उंट हकणारा २४) आश्चर्य; अचंबा २५) एक प्रकारचे तलम सुती कापड

**उभे शब्द :-** १) चारही बाजू समान व चारही कोन नव्वद अंशाचे असा चौकोन २) सत्त्व; परीक्षा ३) सोबती; मित्र; यार ५) सैन्य; लष्कर; सेना ६) अनेक रस्ते एकत्र येतात ते ठिकाण; जकात वसुलीचे ठिकाण ८) तिसरी तिथी; तृतीया १०) जड; भार; तोल पत; प्रतिष्ठा ११) एक मोठे चर्मवाद्य; नौबत १२) डोके; मस्तक; शिर १४) समुद्रात लागलेला अग्नी १५) पुनरुज्जीवन १६) शिजलेला तांदूळ १८) थंड; गार १९) क्षणिक; पातळ; चंचल २१) श्रीमंत; धनवान; सधन २२) सलोखा; समेट; तह; एक वेद २३) डावा; वाईट; खराब

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : सत्कार्यासाठी काम करावे, सत्कारासाठी नाही. इतरांसाठी मनापासून झिजावं दिखाव्यासाठी नाही.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## पेन्सिल केव्हा अस्तित्वात आली?

'पेन्सिल' ही आपल्या जीवनातील फार उपयुक्त गोष्ट आहे. बहुतेक सर्व बांधकामे, वाहने, शस्त्रास्त्रे, युद्धोपयोगी साहित्य, पूल, धरणे आदी महत्त्वाच्या गोष्टी प्रथम कागदावर उतरतात. हे कच्चे आराखडे पेन्सिलने तयार केले जातात; कारण चूक निदर्शनास येताच ती खोडून त्यात योग्य बदल करणे सोपे असते.

आजची पेन्सिल २०० वर्षांपूर्वी जन्माला आली. पूर्वी ग्राफाईट या कार्बनच्या नैसर्गिक रूपाचा उपयोग लिहिण्यासाठी केला जायचा. इ. स. १७९५ मध्ये जे. कोंडे या माणसाने ग्राफाइट आणि चिनी माती यांचे मिश्रण भाजून त्याचे शिसे (म्हणजे पेन्सिलमध्ये वापरतात ते, शिसे हा धातू नव्हे) बनवले व हे शिसे वापरून लिहिले जाऊ लागले.

आता तर रंगीत पेन्सिलीही बाजारात आल्या. एकदा शिसे लाकडात बसवायची युक्ती सापडल्यावर मग हे सर्व शक्य झाले.

## लोभी कुत्रा

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका गावात एक लोभी कुत्रा राहत होता. तो अन्नाच्या शोधात तो गावभर फिरत असे. तो इतका लोभी होता की त्याला जे काही खायला मिळालं ते कमी वाटायचे.


पण त्याची गावातील इतर कुत्र्यांशी चांगली मैत्री होती, आता मात्र त्याच्या या सवयीमुळे सर्वजण त्याच्यापासून दूर राहू लागले, पण त्याला त्याची पर्वा नव्हती, त्याला फक्त त्याच्या खाण्याची काळजी होती. जवळून जाताना कोणी ना कोणी त्याला खायला देत असे. त्याला जे काही खायला मिळेल ते तो एकटाच खाऊन टाकायचा.

तसेच एके दिवशी त्याला कुठूनतरी एक हाड सापडलं. हाड बघून त्याला खूप आनंद झाला. एकट्यानेच त्याचा आनंद घ्यावा असे त्याला वाटले. असा विचार करत तो गावातून जंगलाकडे जाऊ लागला. वाटेत नदी ओलांडत असताना त्याची नजर खाली असलेल्या नदीच्या साचलेल्या पाण्यावर पडली. नदीच्या पाण्यात आपलाच चेहरा दिसतोय हेही त्याला कळले नाही. त्याला वाटले की खाली एक कुत्रा देखील आहे, ज्याने देखील हाड तोंडात धरले आहे.

त्याने विचार केला की मी त्याचे हाडही का हिसकावून घेऊ नये, तर माझ्याकडे दोन हाडे असतील. मग मी आनंदाने एकाच वेळी दोन हाडे खाऊ शकेन. असा विचार करून त्याने पाण्यात उडी मारताच त्याच्या तोंडातील हाड देखील त्याच्यासकट नदीत पडले. पाण्यातून तो कसाबसा बाहेर आला. तसेच त्याने केलेल्या कृत्याचा त्याला पश्चाताप झाला.

तात्पर्य : लोभ असल्याने नुकसान होते.

# रहमते दर्शन (भाग - १)



### वे एक समाज सुधारक भी थे

तरह महाराज जी के दर्शनार्थ 'मोना कॉटेज' में जाता रहा। डॉक्टर तो केवल एक साधन होता है। वस्तुतः दया तो दयाल पुरुष की ही थी। अगले वर्ष महाराज जी की दया से मुझे पुत्र रत्न की प्राप्ति हो गई, जिसे वक्त के महापुरुष संत राजिन्दर सिंह जी महाराज से नामदान मिला। अब मैं अपनी दूसरी बात करता हूँ कि किस प्रकार महाराज जी मुझ पर दया की। मैं बेरोज़गार था। जगह-जगह फार्म भरे परन्तु निराशा ही हाथ लगी। मैंने मिलिट्री की नौकरी के लिए आवेदन किया। मगर एक न एक कारण से साक्षात्कार में फेल कर दिया जाता। अंत में मैंने महाराज जी से प्रार्थना करने का निर्णय किया। यह बात सन् १९८२ की है। महाराज जी के समक्ष पेश होने के उपरान्त उन्होंने मुझसे फेल होने का कारण पूछा। मैंने कहा, 'महाराज जी! मैं टैस्ट में तो पास था परन्तु साक्षात्कार में पास नहीं हो सका।

महाराज जी ने अपना दया भरा हाथ मेरे सिर पर रखते हुए मुझे सांत्वना दी और बोले, महाराज जी दया करेंगे। मैं खुशी-खुशी घर लौटा। इस बार लिखित परीक्षा पास करने के उपरान्त, जब मैं साक्षात्कार के लिए गया तो जो बोर्ड का अध्यक्ष था, उसने मुझे साक्षात्कार के मैं तुम्हारे लिए क्या कर सकता हूँ? मैंने उपरान्त बुलाया और पूछा उत्तर दिया, अगर मैं वास्तव में इस नौकरी के योग्य हूँ, तो आप मुझे यह नौकरी दे दीजिए। वे बड़े खुश हुए और मैं इस नौकरी के लिए चुन लिया गया।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

### दिमाग की शक्ती

कोई नई खोज करें तो उसे लिख डालें। बड़े बड़े विज्ञानिक जिनकी स्मरण शक्ति बहुत तेज होती है, वो भी नये फार्मूले को ईजाद करने के बाद नोट कर लेते हैं ताकि भूलने की कोई गुजाईश न रहे और वक्त पड़ने पर काम आए। मस्तिष्क का कार्य क्षेत्र बहुत ऊंचा है। रचना, समन्वय, संगठन, प्रेरणा देना और निर्णय करना मनुष्य के ऊंचे कार्य क्षेत्र हैं। देवता सर्वगुण संपन्न १६ कला संपूर्ण होते हैं। उन कलाओं में एक कला है स्मृति कला यानी कि स्मरण शक्ति । स्मृति के लिये मस्तिष्क का जो भाग कार्य करता है उस में ऐसीटाइलकोलीन डोयामीन (लशींूश्रलहेश्रळपश वेळराळपश) तथा प्रोटीनस के माध्यम से एक रसायनिक क्रिया होती है। जहां ये रसायनिक क्रिया होती है वहां मस्तिष्क की कोशिकाएं जितनी संघनता से गुथी होती हैं, उतना ही स्मृति का विकास होता है। सभी प्रकार के मानसिक रोग स्मृति से जुड़े होते हैं। चिंता, अशांति और घबराहट यादाश्त केन्द्र को नुकसान करते हैं जिस के कारण समय पर चीजें याद नहीं आती हैं। मानसिक दुर्बलता और मानसिक रोगो के कारण विद्यार्थी परीक्षा पत्र, देख कर घबरा जाते हैं और याद किया हुआ भी सब भूल जाते हैं। असहवा नकारात्मक विचार ही मानसिक रोग हैं। मानसिक रोगों का सीधा प्रभाव स्मरण शक्ति पर पड़ता है। निराशा भी मानसिक रोग है।

मानव जीवन में पल पल हमें निराशा और हताशा का सामना करना पड़ता है। किसी न किसी व्यक्ति से संघर्ष होता रहता है। इस संघर्ष से स्मरण शक्ति कमजोर होती है। इसलिए मन में जिन व्यक्तियों से संघर्ष है उसके बदले उन लोगों के बारे सोचते रहा करें जिन से कोई मतभेद नहीं है। बहुत से लोगों की स्मरण शक्ति तेज होती है परंतु आत्मविश्वास की कमी के कारण वे कुछ नहीं कर पाते।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# साहित्य सहवास - 'सावित्रीबाई आणि आपण...'

पावणेदोनशे वर्षांपूर्वीच्या काळाचा विचार केल्याचं तुम्हाला आठवतंय का? नाहीच आठवणार. परंतु त्या काळाचा विचार, आज, पावणेदोनशे वर्षांनी करणं गरजेचं आहे. स्त्री म्हणजे फक्त चुल आणि मुल ह्याकरिताच, असा विचार करणाऱ्या काही व्यक्ती त्या काळात होत्या. पत्नीने पती निधनानंतर सती जायचं अथवा केशवपन करायचं अशा ह्या कर्मठ विचारांच्या समाजाचा विरोध कोण करणार? ह्या अशा विचारसरणीच्या काळात फुले दांपत्याने केलेलं काम, आपल्यासाठी आज प्रेरणादायी आहे. एक स्त्री शिकली की, संपूर्ण कुटुंब शिकतं हे, थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुलेंच्या लक्षात आलं. सर्वप्रथम, ज्योतिबानं सावित्रीबाईंना शिकवलं. त्यावेळच्या कर्मठ विचारांच्या समाजाशी संघर्ष करत सावित्रीबाईने, मुलींना शिकवलं. त्यावेळच्या काही व्यक्तींनी, सावित्रीबाईवर चिखल फेकला, शेण फेकलं पण न खचता, न रागावता, न चिडता शांतपणे अन्याय सहन केला पण मुलींना शिक्षण देण्याचं व्रत त्यांनी सोडलं नाही. आपल्या ध्येयाप्रती असणारी ही निष्ठा तुमच्या-माझ्यात यायलाच पाहिजे. ज्या काळात स्त्री अनेक बंधनात होती, घराबाहेर जाऊ शकत नव्हती त्या काळात मुलींना शिक्षण देणं प्रचंड अवघड काम होतं. चिखल, शेण, अवमान सहन केला पण मुलींना शिकवलंच. आज सावित्रीबाईंच्या लेकी विविध क्षेत्रात स्वत:ला सिध्द करताहेत. सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, खेळांसह विविध क्षेत्रात, सावित्रीबाईच्या लेकी स्वत:च्या कर्तृत्वाचा ठसा उमटवताहेत. फक्त एकदाच विचार करा - सावित्रीबाईने मुलींना शिकवलं नसतं तर? कदाचित आजही स्त्रिया, चुल आणि मुल, एवढ्याच करिता असत्या. सावित्रीबाई फुलेंच्या ऋणात राहाणं आपल्या प्रत्येकाचं आद्य कर्तव्य आहे. ऋणात आहोत, ऋणातच राहुया. सावित्रीबाईंनी घेतलेलं शिक्षणाचं व्रत आजही आपण चालु ठेऊ शकतो. आम्ही विविध जात, धर्म, पंथाच्या मित्र, मैत्रिणींनी ५ मे २००१ सालापासून सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्थेच्या माध्यमातुन शिक्षण क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात जे करणं शक्य आहे ते केलं आहे, करत आहोत आणि ह्यापुढेही करणारंच आहोत. विविध जात, धर्म, पंथाच्या व्यक्तींकरिता चांगलं करणं आपल्या प्रत्येकाची 'माणूस' म्हणून जबाबदारी आहे, कर्तव्य आहे. 'माणूस' म्हणून एकमेकांकडे पाहाणं हाच आपला माणूसकीचा धर्म आहे. खरं तर सेवाभावी संस्थेचे आम्ही सदस्य, माध्यम आहोत. निमित्तमात्र आहोत. कर्ता-करविता निसर्ग, परमेश्वर आहे.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त एका महिलामंडळानं माझ्या व्याख्यानाचा (प्रेरणादायी संवाद) कार्यक्रम आयोजित केला होता. सावित्रीबाईंविषयी मी, उपस्थितांना सांगितलं. एक प्रश्न विचारला की सावित्रीबाईंच्या कार्याचं स्मरण कितीजणी करता ? तिघींनी हात वर केले. पैकी एक महिला म्हणाली की माझ्या घराजवळ ज्या महिला निरक्षर आहेत, त्यांना साक्षर करण्याचं काम, मनापासून करते आहे. माझ्यातली सावित्रीबाई हे कार्य माझ्याकडुन करुन घेते आहे. उपस्थित महिलांनी जोरदार टाळ्या वाजवुन आणि उभा राहुन तिच्या ह्या कार्याला सलाम केला. तेव्हा मी म्हणालो की राष्ट्रपुरुष, राष्ट्रमाता ह्यांची जयंती, पुण्यतिथी आपण साजरी करायलाच पाहिजे. त्यांच्या कार्याचा, आदर्श आचार, विचारांचा अंगिकार करणं हे आपलं आद्य कर्तव्य आहे. त्यांच्या प्रमाणे स्वत:ला घडवण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करणं आज काळाची गरज आहे. उद्याची सावित्री, जिजाऊ आईसाहेब घडवणं पालकांची जबाबदारी, कर्तव्य आहे. ह्यासाठी पालकांनी सर्वप्रथम राष्ट्रपुरुष, राष्ट्रमातांची चरित्रं वाचनं अत्यंत गरजेचं, महत्वाचं आहे. आजचा काळ प्रचंड प्रगत असा काळ आहे. वाचन करणं शक्य झालं नाही तरी ऑडिओ बुक ऐकु शकता. आपला पाल्य हा आपला सर्वस्व असतो. त्याला सुजाण नागरिक करण्यासाठी, पाल्याला घडवतांना, सुसंस्कारित करतांना ही चरित्रं, सर्वप्रथम आपल्याला घडवणार आहेत. एकदा ध्येय निश्चित केलं की ध्येयाच्या म ार्गावरुन चालणं नक्कीच शक्य होतं. आपल्या ध्येयावर असणारी आपली निष्ठा, प्रेम आपल्याकडुन बरंच काही चांगलं असं करुन घेतं, आपल्याकडुन होतं. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच सावित्रीबाईंची जयंती असते. अर्थात सावित्री उत्सव विविध सामाजिक उपक्रमांनी विद्यार्थी- महिलांकरिता विविध स्पर्धा घेऊन, शिक्षण विषयक जनजागृती फेरी काढुन साजरा केला जातो. मुलींना शिकवणं, त्यांच्या पायांवर उभं करुन देणं हे प्रत्येक पालकाचं आद्य कर्तव्य आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या पुढच्या काळाचा आज गांभिर्याने विचार कराच.

(लेख क्र.५३४)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### प्रसूतिअवस्था

तसेच सूतिकेच्या शरीरातील अतिरिक्त वाढलेला मेद धातू कमी होण्यास मदत होते. अग्नी प्रदीप्त झाल्या मुळे पचन व्यवस्थित होऊन पोट साफ राहण्यास मदत होते, सूतिकेचा आहार हा दूध वाढवण्यासाठी जास्त प्रमाणात घेणे जरुरीचे असते. अशा अवस्थेत अजीर्ण होण्याची भीती असते. अजीर्ण होऊन झालेली स्तन्यउत्पत्ती बाळाच्या आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक असते. स्तन्यदृष्टीने बाळामध्ये सर्दी, खोकला, पोटात गॅस धरणे, त्वचा विकार असे विविध आजार निर्माण होऊ शकतात, म्हणून सूतिकेने अजीर्ण होणार नाही, खाल्लेल्या अन्नाचे पचन व्यवस्थित होईल एवढाच आहार घ्यावा. एकदम पोटभर जेवण्यापेक्षा दर २ ते ३ तासांनी हलक्या स्वरूपाचा पोषण करणारा आहार घ्यावा.

आयुर्वेदामध्ये आहार घेताना आमाशयाचे (जठराचे) चार भाग वर्णन केलेले आहे भागांपैकी दोन भाग घन स्वरूपाचा आहार १ भाग पाणी किंवा द्रव पदार्थासाठी हवेसाठी रिकामा ठेवावा असे सांगितले आहे. याचाच अर्थ प्राचीन काळापासून सांगितले आहे. सूतिकेने दर २ ते ३ तासांनी गरम ताजे बनवलेले अन्न खावे. मागे वर्णन केल्याप्रमाणे तांदूळ व मूग भाजून, ते धुऊन मिक्सरमधून बारीक करून घ्यावे व त्यामध्ये सुंठ, काळी मिरी, सैंधव, जिरे यांची साजूक तुपात फोडणी देऊन थोडे गरम असतानाच ही पेज प्यावी. ही पेज पचायला सोपी असते; तसेच हळद ही स्तन्य शुद्धीकारक असल्याने हळदीचा वापर जेवण बनविताना भरपूर करावा. हळद शरीराचे पोषण करणारी असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जमिनीची सरकारी मोजणी पद्धती व आवश्यकता


जमीन मोजणी हा आपल्याकडे खूप महत्वाचा घटक मानला जातो. मोजणी ही खाजगी व सरकारी पद्धतीने केली जाते, परंतु सरकारी मोजणीकरीता विलंब होत असल्याचे शेतकरी सांगतात. खाजगी मोजणीपेक्षा सरकारी मोजणी ही सर्वमान्यताप्राप्त असून, त्याला कायदेशीर मान्यता आहे. खाजगी मोजणी नही व्यक्तीपरत्वे बदलत असल्याने सरकारी मोजणीला जास्त महत्व आहे. पूर्वी जमीन मोजण्याकरिता लेखी अर्ज भरून देण्याची पद्धत होती परंतु आता शासनाने त्यामध्ये बदल करून ऑनलाईन पद्धती अवलंबली आहे. आता ई मोजणी नवीन वेबसाईट नागरिकांसाठी उपलब्ध आहे, त्या माध्यमातून आपण ऑनलाईन अर्ज भरून आपल्या जमिनीची सरकारी मोजणी करून घेऊ शकतो.












**जमिनीची मोजणी का करावी?**

शेतकरी हा पूर्वीपासून पिढी परंपरागत शेतीव्यवसाय करत आलेला असतो. त्यामुळे शेती करताना भरपूर ठिकाणी बांध सरकणे व जमिनीवर पूर्ण ताबा नसणे यामुळे भविष्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे सरकारी मोजणी करून घेणे व आपली जमीन पूर्ण ताब्यात आहे का? हे तपासणे, याची आवश्यकता असते.

**मोजणी कोणत्या उपकरणांद्वारे केली जाते ?**

पूर्वी जमीन मोजण्यासाठी मेजरमेंट टेप , प्लेन टेबल सर्व्हे यांचा वापर केला जात असे. त्यानंतर टोटल स्टेशनच्या मदतीने मोजणी केली जात असे. परंतु आता रोव्हरच्या सहाय्याने सॅटेलाईटद्वारे अचूक मोजणी केली जाते. यामुळे मोजणी करण्यासाठी लागणारा अतिरक्त वेळेमध्ये बचत होते.

**मोजणी करण्याचे प्रकार व कालावधी**

**मोजणी करण्याचे चार प्रकार पूर्वी अस्तित्वात होते ते पुढीलप्रमाणे**

साधी मोजणी - ६ महिने कालावधी
तातडीची मोजणी - ३ महिने कालावधी
अतितातडीची मोजणी - २ महिने कालावधी
अतिअतितातडीची मोजणी - १५ दिवस कालावधी.

परंतु शासनाने आता दोन प्रकारच्या मोजणी पद्धती ठेवल्या आहेत.

साधी मोजणी - ३ महिने कालावधी
द्रुगती मोजणी मोजणी - १ महिने कालावधी

**मोजणी करण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे : हद्द कायम मोजणी कागदपत्रे**

१. फ्रेश सातबारा उतारा
२. जागा धारकाचा फोटो आणि आधारकार्ड
३. मोजणी फी भरल्याचे चलन
४. लगत खातेदारांचे नाव आणि पत्ता

**मोजणीचे प्रकार व त्याविषयी माहिती**

मोजणीचे खालील प्रकार असून, आपल्या गरजेप्रमाणे आपणास कश्या प्रकारे मोजणी करायची याचा निर्णय घेता येतो.

१. हद्द कायम मोजणी
२. बिगरशेती मोजणी (ले आऊट अंतिम करताना केली जाते)
३. पोट हिस्सा मोजणी
४. गुंठेवारी
५. कोर्ट वाटप
६. भूसंपादन
७. कोर्ट कमिशन

**मोजणी करतेवेळी घ्यावयाची काळजी**

१. शासकीय मोजणी करतेवेळी शक्य झाल्यास त्याची चित्रफित काढून ठेवावी.

२. कालांतराने हद्दीसंबंधी वाद झाल्यास चित्रफित अथवा व्हीडीओ शुटींग पुरावा म्हणून मांडता येतो.

३. जमीन किंवा प्लॉटच्या मोजणी नंतर आपल्या हद्दीचे कुंपण घालून घ्यावे.

४. प्लॉट किंवा जमीन घेताना सरकारी मोजणी करूनच विकत घ्यावे.

**पोट हिस्सा मोजणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे**

१. हद्दवाढ मोजणी नकाशा
२. आकार फोड
३. सातबारा उतारा
४. फोटो आणि आधार कार्ड
५. लगतच्या खातेदारांचे नावे आणि पत्ता

**बिगरशेती मोजणी कागदपत्रे :**

१. मोजणी नकाशा
२. तात्पुरती मंजूर ले आऊट
३. सातबारा उतारा
४. तहशील एन ओ सी
५. लगतच्या खातेदारांचा नावे व पत्ता
६. फोटो व आधाकार्ड

इंजि.प्रिन्स फुलसौंदर यांनी मागील ७ वर्षापासून अहिल्यानगर शहर व जिल्ह्यामध्ये जागा मोजणी आणि ले आऊट मंजुरी यांची विविध कामे केलेली आहेत. तसेच बिल्डरशिपच्या माध्यमातून विविध बांधकाम प्रकल्प पूर्णत्वास नेले असून प्लानिंग आणि बांधकाम परवानगीची कामे अहिल्यानगर महानगरपालिका आणि टी पी विभागांतर्गत करत आहेत.

**- इंजि. प्रिन्स फुलसौंदर (बी ई सिव्हील इंजीनिअर, एम ई कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट)**
**ले आऊट कन्सल्टंट,**
**सदस्य - आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर**
**आशिर्वाद डेव्हलपर्स**
**शॉप नंबर १, आनंद हाईट्स, चाणक्य चौक, बुरूडगाव रोड, अहिल्यानगर**
**मो. : ८४४६२५०६०८**
Email ID - ashirwadconstruction77gmail.com



WE CREATE THE WORLD
Reg. No. Mah/1393/1987
F 1350/1988/ANR
आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

## अहिल्यानगर शहरात १९ जानेवारी रोजी 'बिनाका गीतमाला' कार्यक्रमाचे आयोजन

नगर - आर आर ग्रुप तर्फे १९ जानेवारी रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेमध्ये रहमत सुलतान हॉल, सर्जेपुरा, अहिल्यानगर येथे बिनाका गीतमाला कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये गायक श्रीपाद शहाणे, देवदत्त शहाणे, रामन्ना गालपेल्ली, निलेश गाडेकर, संजय भिंगारदिवे, डॉ. सुद्रिक, इकबाल बागवान, अन्सार शेख, राजेंद्र शहाणे, योगिनी अकडकर, माधवी गुजर, समीर शेख, श्रीशैल शिवगुंडे, संगीता भांबळ, डॉ.डोंगरे आदी सादर करणार आहेत. हा कार्यक्रम प्रेक्षकांसाठी विनामूल्य आहे. नागरिकांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन जावेद मास्टर यांनी केले आहे. जावेद मास्टर हे एक गायक असून ते नवोदितांना कराओके ट्रॅक वरती फिल्मी गाणी देखील अत्यल्प दरामध्ये शिकवत असतात. संपर्कासाठी ९९६०३७१४९७.



माऊंट आबू (राजस्थान) महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे संस्थापक प्रजापिता ब्रह्मा बाबा यांच्या ५६ व्या पुण्यतिथी निमित्त पांडव भवन, माउंट अबू येथे त्यांच्या समाधीला भेट देऊन श्रध्दांजली वाहिली.

## श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचे २० व २१ जानेवारीला वार्षिक स्नेहसंमेलन

नगर - श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन २० व २१ जानेवारी रोजी माऊली सभागृह, नगर मनमाड रोड, अहिल्यानगर येथे होत आहे.

२० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता प्री-प्रायमरी ते इयत्ता दुसरीपर्यंतचे संमेलन आयोजित केले आहे. २१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता इयत्ता तिसरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आयोजित केले आहे. या दोन्ही कार्यक्रमास सर्व पालक, पाहुणे, आमंत्रित व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महर्षी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक कानडे, एज्युकेशन डायरेक्टर तसेच नंदकिशोर भावसार, प्राचार्य सौ. तनुजा लोंढे व सर्व शिक्षक वृंदांनी केले आहे.

## खेळामुळे कृतीशीलता येऊन विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता वाढीस लागते

### प्राचार्य भरत बिडवे यांचे प्रतिपादन; भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय अंतर्गत क्रीडा मेळावा

नगर - विद्यार्थ्यांचा मानसिक विकास होण्यासाठी व आरोग्य सुदृढ राहण्यासाठी मैदानी खेळ महत्त्वाचे आहे. स्पर्धेत भाग घेतलेले खेळाडूंमध्ये खिलाडीवृत्ती असली पाहिजे खेळामुळे कृतीशीलता येऊन विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता वाढीस लागते असे अनेक फायदे मैदानी खेळामुळे होत असतात परंतु नवीन पिढी मोबाईल मध्ये गुंतली जात आहे या ऐवजी विद्यार्थ्यांनी मैदानावर विविध प्रकारचे खेळ खेळले पाहिजे भाग्योदय विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणांसाठी राबविण्यात येत असलेले उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन ना. ज. पाऊलबुद्धे विद्यालयाचे प्राचार्य भरत बिडवे यांनी केले.



केडगाव येथील भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य भरत बिडवे व माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे यांच्या हस्ते हवेत फुगे व कबूतर सोडून झाले.

केडगाव येथील भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य भरत बिडवे व माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे यांच्या हस्ते हवेत फुगे व कबूतर सोडून झाले. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, कदम गोविंद, कोतकर बाबासाहेब आदी उपस्थित होते.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या गुणांची पारख होण्यासाठी शालेय उपक्रम राबवण्यात येत असतात यामधील क्रीडा मेळाव्याचे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक व बौद्धिक तसेच भावनीक विकास होण्यासाठी क्रीडा स्पर्धा महत्त्वाच्या आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्यातील गुणांचे प्रदर्शन करण्याची संधी मिळते. विद्यालयाच्या प्रोत्साहनाने अनेक विद्यार्थी शालेय राज्य व जिल्हास्तरावर चमकत आहेत याचा विद्यालयाला अभिमान आहे.

महेंद्र हिंगे यांनी आपल्या मनोगतात क्रीडा स्पर्धा ह्या आनंदाचा क्षण आहे खेळाडूंना स्पर्धा परीक्षेमध्ये ५ टक्के आरक्षण आहे व १० वी व १२ वी परीक्षेत १० गुण आहेत नोकरीत संधी आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता ओळखून खेळामध्ये भाग घ्यावा. खेळामुळे विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा विकास होतो. सांघिक भावना वाढीस लागतात.

प्रास्ताविक एकनाथ होले यांनी तर सूत्रसंचालन दत्तात्रय पांडुळे यांनी केले. आणि आभार प्रदर्शन क्रीडा शिक्षक सोपान तोडमल यांनी मांडले. या क्रीडा स्पर्धेत खो-खो, गोळा फेक, कबड्डी भालाफेक, धावणे, संगीत खुर्ची तसेच मनोरंजनात्मक खेळांमध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते.

क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कोतकर बाबासाहेब, साहेबराव कार्ले, धनंजय बारगळ, संतोष काकडे, आदिनाथ ठुबे, गोरक्ष कांडेकर, क्रीडा शिक्षक सोपान तोडमल, एकनाथ होले तसेच गणेश गायकवाड, कावरे बाळासाहेब, सुधाकर गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

## आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी तेजस म्हस्केची निवड



नगर - आयकॉन पब्लिक स्कूलचा विद्यार्थी तेजस म्हस्के याने एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज (एएफएमसी) मध्ये एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. देशभरातील हजारो इच्छुकांमध्ये स्पर्धा करत, तेजसने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही निवड त्याच्या कठोर परिश्रमाची आणि त्याला शाळेने प्रदान केलेल्या मजबूत शैक्षणिक पायाचा दाखला आहे, असे मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी म्हटले आहे.

आयकॉन पब्लिक स्कूलला तेजस सारख्या विद्यार्थ्यांचा प्रचंड अभिमान वाटतो, जे उत्कृष्टता आणि दृढनिश्चयाचे उदाहरण देतात. त्याचे यश त्याच्या समवयस्कांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. संपूर्ण भारतातून एकूण ३८९३ विद्यार्थी या अभ्यासक्रमाच्या निवड प्रक्रियेत सहभागी झाले होते. त्यापैकी १४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती, ज्यामध्ये तेजसने ५२ वा. क्रमांक प्राप्त केला. आयकॉन पब्लिक स्कूलने शिस्त, नैतिकता आणि सातत्य शिकवले आहे, ज्यामुळे त्याला त्याच्या संपूर्ण तयारीच्या टप्प्यात मदत झाली. शाळेने दिलेल्या सर्व सहकार्याबद्दल पालकांनी त्यांचे आभार मानले आहेत.



भिंगार अर्बन बँक सावेडी झोपडी कॅन्टीन शाखेच्या महिला खातेदार यांचे लॉकर रूम मध्ये नजरचुकीने विसरलेले सोन्याचे दागिने त्यांना परत करण्यात आले. यावेळी बँकेचे शाखाधिकारी संदीप पाटील, स्वाती चिपाडे, सुनील राऊत, शिवाजी पटवेकर आदी उपस्थित होते.

## भिंगार अर्बन बँक सावेडी झोपडी कँटीन शाखेच्या कर्मचारी यांचा प्रामाणिकपणा

### खातेदाराला लॉकर रूम मधील विसरलेले सोन्याचे दागिने केले परत

नगर - भिंगार अर्बन बँकेच्या सावेडी झोपडी कॅन्टीन शाखेच्या महिला खातेदार यांचे लॉकर रूम मध्ये नजरचुकीने विसरलेले सोन्याचे दागिने बँकेचे कर्मचारी यांच्या लक्षात आल्याने त्यांना ते परत करण्यात आले.

शाखेच्या महिला खातेदार यांचे लॉकर रूम मध्ये नजरचुकीने विसरलेले सोन्याचे दागिने त्यांना परत करण्यात आले. यावेळी बँकेचे शाखाधिकारी संदीप पाटील, स्वाती चिपाडे, सुनील राऊत, शिवाजी पटवेकर आदी उपस्थित होते.

यावेळी महिला खातेदार म्हणाल्या कि, भिंगार बँकेचे दुसरे नाव विश्वास आहे, हे बँकेच्या ग्राहकांनी दाखवुन दिले. आजच्या काळात कोणतीही वस्तु हरवली की ती परत मिळत नाही. परंतु भिंगार बँकेने जो विश्वास आज खातेदारांना दिला आहे, तो आज प्रत्यक्ष दिसल्यामुळे बँकेवर अजून विश्वास बसला आहे. सर्व संचालक व कर्मचार्यांचे त्यांनी यावेळी आभार मानले.

यावेळी बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन व बॅकेचे संचालक मंडळाने या बँकेच्या सावेडी झोपडी शाखेच्या शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

## अपंगत्वावर मात करण्यासाठी स्वतःवर विश्वास ठेवल्यास काहीच अशक्य नसते

### पद्मश्री डॉ.दीपा मलिक यांचा संदेश

नगर - अपंगत्वाच्या मागे खूप दिव्यांगता लपलेली असते. या अपंगत्वावर मात करण्यासाठी स्वतःवर विश्वास ठेवल्यास काहीच अशक्य नसते. खेळ हे क्षेत्र प्रेरणा व स्फूर्ती देणारे असून उत्तम करियर साठीही योग्य क्षेत्र आहे, असा संदेश देशाच्या पहिल्या महिला पॅरालिम्पिक पदक विजेत्या, खेलरत्न व अर्जुन पुरस्कार प्राप्त पद्मश्री डॉ.दीपा मलिक यांनी दिला.



पद्श्री डॉ.दीपा मलिक लिखित 'ब्रिंग इट ऑन' पुस्तकाचे नगरच्या कोहिनूर मॉलमध्ये उत्साहात स्वागत झाले. यावेळी अश्विन गांधी, क्रीडा प्रशिक्षक विलास दवणे व रावसाहेब बाबर, पवन गांधी, गौतम मुनोत आदी.

### 'ब्रिंग इट ऑन' या प्रेरणादायी पुस्तकाचे अहिल्यानगरमध्ये उत्साहात स्वागत

डॉ.दीपा मलिक यांच्या 'ब्रिंग इट ऑन' या प्रेरणादायी पुस्तकाचे नुकतेच अहिल्यानगरच्या कोहिनूर मॉलमध्ये वितरण झाले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुलाखतीत पद्मश्री दीपा मलिक यांनी आपली यशोगाथा सांगून उपस्थितांना थक्क केले. या पुस्तकात दीपा मलिक यांनी स्वतःचा आव्हानात्मक प्रवास व प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जीवनाची यशोगाथा सांगितली आहे. कोहिनूरचे अश्विन गांधी, आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचे पवन गांधी यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

डॉ.दीपा मलिक यांनी आपली यशोगाथा मांडताना सांगितले, नगर हे माझे गाव असून मी आज जी घडली आहे त्यात नगर शहराचा मोठा वाटा आहे. अपंग ते दिव्यांग होण्याची प्रेरणा व सुरवात नगर शहरातूनच झाली. हे माझे सौभाग्य. वयाच्या ५ व्या वर्षी मला पॅरालेसिस झाल्याने मी चालूही शकत नव्हते. पण मेहनत व प्रचंड इच्छा शक्तीवर अपंगावर मात करत मी चालण्यास यशस्वी झाले. मात्र वयाच्या ३०व्या वर्षी पुन्हा पॅरालेसिसचा अ‍ॅटॅक आला. पण याही वेळीस मी न डगमगता अपंगत्वावर मात करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा निश्चय केला. एक छोटे रेस्टॉरंट सुरु करून जनसंपर्क सुरु केला. येथेच मला अनेकांकडून बरेच ज्ञान मिळाले. या रेस्टॉरंट मुळेच मला पॅरालिम्पिक कमिटीचे विलास दवणे भेटले. विलास दवणे, स्व.ढमाले व रावसाहेब बाबर या प्रशिक्षकांनी मला वयाच्या ३६ व्या वर्षी पॅरा स्पोर्ट्स खेळण्याची प्रेरणा व प्रशिक्षण दिले. त्यानंतर न थांबता सतत सराव करून मी राष्ट्रीय स्तरावालील खेळात यश संपादन केल्यावर अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्येही देशाचे नेतृत्व करत अनेक पदके जिंकले. पॅरालिम्पिक स्पर्धेत देशाला पहिले मेडल मी मिळवून दिले.

यावेळी दीपा मलिक यांनी क्रीडा प्रशिक्षक विलास दवणे व रावसाहेब बाबर यांच्यासह अश्विन गांधी, पवन गांधी, गौतम मुनोत यांना पुस्तक दिले. तसेच रेस्टॉरंट मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही या कार्यक्रमात पाचारण करण्यात आले होते. त्यांनाही डॉ.मलिक यांनी 'ब्रिंग इट ऑन' हे पुस्तक दिले. यावेळी रेस्टॉरंटच्या जुन्या आठवणी सांगताना डॉ.मलिक यांचे व कर्मचाऱ्यांचे डोळे पाणावले. डॉ.दीपा मलिक यांची मुलाखत नीना गांधी यांनी घेतली. यावेळी नीता गांधी, श्वेता गांधी, ऋषी गांधी आदी उपस्थित होते.

# किशोरवयीन गटाची मुले हीच खरी क्रीडांगणाची संपत्ती

## श्रीमती कोमल वाकळे




म.ए.सो. क्रीडा करंडक २०२५ स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे माजी विद्यार्थिनी शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू कोमल वाकळे व नगर पश्चिम प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते यांच्या हस्ते करण्यात आले.(छाया : यतीन कांबळे)

नगर – खेळाडू विद्यार्थ्यांनी किशोरवयीन गटापासूनच आपल्या खेळा प्रतीच्या लक्ष्याचा वेध घ्यावा आणि त्यासाठी कष्ट करावे. किशोरवयीन गटाची मुले हीच खरी क्रीडांगणाची संपत्ती आहे, असे प्रतिपादन श्रीमती कोमल वाकळे यांनी केले.

म. ए. सो. रेणावीकर विद्या मंदिर मध्ये क्रीडा करंडक सोहळ्याचे उद्घाटन शाळेची माजी विद्यार्थीनी आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू श्रीमती कोमल वाकळे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी पद नगर पश्चिम प्रांत संघचालक आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी संशोधक प्राध्यापक नानासाहेब जाधव यांनी भूषविले. तर अध्यक्षस्थानी म. ए. सो. नियामक मंडळाचे उपाध्यक्ष प्रदीप नाईक उपस्थित होते.

या सोहळ्यात घोष पथकाने सर्वांचे स्वागत केले तर क्रीडा ज्योतीची स्थापना आणि क्रीडा ध्वजावरोहण झाले. प्रशालेच्या गानवृंदाने ईश स्तवन आणि स्वागत गीत सादर केले.

प्रशालेचा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळणारा खेळाडू भावेश पवार याने खेळाडूंना शपथ दिली. तसेच अतिशय सुंदर असे लाठी काठीचे क्रीडा प्रात्यक्षिक प्रशालेच्या चमूने सादर केले. म. ए. सो.चे अध्यक्ष बाबासाहेब

### रेणावीकर विद्या मंदिरात क्रीडा करंडकाचे धूम धडाक्यात उद्घाटन

शिंदे यांनी आपल्या प्रास्ताविकातून प्रशालेची वाटचाल सांगितली. म. ए. सो. क्रीडावर्धिनी पुणे चे अध्यक्ष विजय भालेराव यांनी परिचय करून देऊन स्वागत सत्कार केला.

प्रशालेच्या शाला समितीचे अध्यक्ष राजीव हजिरनीस सर यांनी या क्रीडा करंडकासाठी प्रशालेच्या तीनही विभागांच्या सर्व कर्मचारी वृंदाने तसेच सर्व पालकांनी नगरकर दात्यांनी दिलेल्या बहुमोल अशा योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे खास आकर्षण असलेला क्रीडा करंडकाचा शुभंकर सिंह याचे शिल्प देऊन प्रमोद कांबळे यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

सूत्रसंचालन श्रीमती शकुंतला आहेरकर यांनी केले तर आभार मयेसोचे सचिव डॉक्टर अतुल कुलकर्णी यांनी मानले.

तसेच परिसरातील नागरिकांनी प्रशालेच्या क्रीडांगणावर चालणारा हा क्रीडा सोहळा पाहण्यासाठी त्याचा आनंद घेण्यासाठी जरूर यावे असे आग्रहाचे निमंत्रणही दिले

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी म.ए.सो.चे सर्व पदाधिकारी तसेच स्थानिक प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. ललिता कारंडे आणि पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा कुलकर्णी यांनी आणि त्यांच्या सर्व टीमने परिश्रम घेतले.



सप्टेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत सावेडीतील श्री समर्थ विदया मंदिर प्रशालेतील विदयार्थ्यांनी यश संपादन केल्याबददल ॲड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. (छाया – उदय जोशी)

# शासकीय ग्रेड चित्रकला परीक्षेत 'समर्थ' चे सुयश

नगर – सप्टेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेने याही वर्षी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली. इलेमेंटरीचे ए ग्रेड मध्ये उत्तीण विद्यार्थी आदीती हराळ, अंकीता राउत, अंकीता लावेर, अनुश्री मिसाळ, अपूर्वा खंडागळे, भाग्यश्री गायकवाड, भक्ती जपकर, देवयानी घटी, दिपिका खोलम, ज्ञानेश्वरी सूर्यवंशी, जुईली इनामदार, सेजल सुद्रीक.

इंटरमिजिएटचे ए ग्रेड मध्ये उत्तीण विद्यार्थी अक्षरा गंगुल, वरद घोडे

ए ग्रेड मध्ये १४ विदयार्थी व बी ग्रेड मध्ये ५१ विद्यार्थी एकूण १९५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते निकाल १०० टक्के लागला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना प्रशालेतील कलाशिक्षक कु. स्वाती घुले व विवेक भारताल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून या सर्व विद्यार्थ्यांचे श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारिणी सदस्य व शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, मंडळाचे सर्व पदाधिकारी प्रशालेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे या सर्वांनी कौतुक केले आहे.

# समाजात मोठ्या प्रमाणात मोफत आरोग्य शिबीरांची गरज

## डॉक्टर अशपाक पटेल यांचे प्रतिपादन

नगर – देशात रुग्णांची व आजारांची संख्या मोठी आहे. त्या प्रमाणात आरोग्य सेवांची कमतरता आहे. लोकांचा राहणीमान खानपान मध्ये अनियमित्तामुळे आजारांचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत आहे. महागड्या औषधोपचारांमुळे मध्यम वर्गीयांना ते अवाक्याचे बाहेर जात आहे. त्यामुळे आज समाजात मोफत आरोग्य शिबिरांची मोठी गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे डॉ.अशपाक पटेल यांनी केले.

किंग्जगेटरोड येथील पटेल स्पेशालिटी क्लिनिक व अलकरम हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या मुस्लिम शिक्षिका फातेमा शेख यांच्या जयंतीनिमित्त मोफत सर्वरोग निदान, रक्तातील साखर व एच बी ए वन सी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.अशपाक पटेल, डॉ.जहीर मुजावर, शेरअली शेख, तौफिक तांबोळी, समीर सय्यद, वसीम शेख आदी उपस्थित होते. या शिबिराचा मोठ्या प्रमाणात गरजूंनी लाभ घेतला. याप्रसंगी डॉ. अशपाक पटेल यांनी प्रत्येक रुग्णांना त्यांचे आजारा संदर्भात चांगल्या प्रमाणे मार्गदर्शन केले.



पहिल्या मुस्लिम शिक्षिका फातेमा शेख जयंती निमित्त मोफत सर्वरोग तपासणी व निदान आरोग्य शिबीरास प्रतिसाद मिळाला.

मनोगत व्यक्त करताना डॉ.जहीर मुजावर म्हणाले की, आपल्याकडे रोज काही ना काही दिवस साजरे केले जातात. अशावेळी समाजाच्या गरजा ओळखून त्या दिवसांना ते गरजूंना गरज असलेले उपक्रम राबविले पाहिजेत.

प्रस्ताविक करताना अलकरम सोसायटीचे तौफिक तांबोली म्हणाले की अलकरम हॉस्पिटलच्या माध्यमातून वर्षभर नियमित ५० टक्के दरामध्ये रुग्णांना रक्त तपासण्या करून देतो. व कमीत कमी खर्चात लोकांना आरोग्यसेवा ही पूर्वीत असतो. भविष्यात पण असेच अनेक उपक्रम राबविण्याचे आमचे माणस आहेत असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेरअली शेख यांनी केले. तर आभार समीर सैय्यद यांनी मांनले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयेशा सय्यद, शिफा शेख, सादिया शेख व अलकरम सोसायटीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात स्कूल कनेक्ट २.० संपर्क अभियान अंतर्गत पंडित नेहरू हिंदी विद्यालयातील ९ वी, १०वीच्या विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात 'स्कूल कनेक्ट २.०' संपर्क अभियान

नगर – के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात स्कूल कनेक्ट २.० संपर्क अभियान अंतर्गत पंडित नेहरू हिंदी विद्यालयातील ९ वी, १० वीच्या विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांनी विद्यार्थ्यांना वस्तूंच्या उगमापासून त्या विक्रीस जाईपर्यंत त्यांना कोणत्या प्रक्रियेतून जावे लागते व त्या प्रक्रियांदरम्यान असणाऱ्या व्यावसायिक संधींविषयी मार्गदर्शन केले. तर महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने उच्च शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या नवीन विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत व्यावसायिक संधींविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी पंडित नेहरू हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक धिवर सर, कविता शर्मा मॅडम, भोसले मॅडम, परदेशी सर उपस्थित होते. महाविद्यालयातील प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. सविता चव्हाण, सौ. अमृता मुळे, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते

# दादा चौधरी मराठी शाळेतर्फे आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन

नगर – हिंद सेवा मंडळाची, दादा चौधरी मराठी शाळेतर्फे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त २०२४–२५ आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्थापन झालेली 'हिंद सेवा मंडळ या संस्थेची व सेनापती दादा चौधरी यांच्या विचारांचा वारसा घेवून समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांशी शैक्षणिक कार्य करणारी शहरातील सन १९५० साली स्थापन आलेली 'दादा चौधरी मराठी शाळा आहे.

दादा चौधरी मराठी शाळेच्या स्थापनेला ७५ वर्ष पूर्ण होत असतांना शहर व जिल्ह्यातील बालवर्ग व इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी अमृतमहोत्सवी आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचा कालावधी २१ ते २७ जानेवारी असा आहे.

अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चित्रकला स्पर्धा, श्लोक पाठांतर, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, कथाकथन, सूर्यनमस्कार (सांघिक गटाप्रमाणे) स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेत शहरातील व जिल्ह्यातील शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा.

या स्पर्धेसाठी दिली जाणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे चित्रकला स्पर्धे साठी प्रथम क्रमांक रू.७०१, द्वितीय क्रमांक रु.५५१, तृतीय क्रमांक ३५१ स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक, कथाकथन स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक रुपये ७०१, द्वितीय क्रमांक रुपये ५५१, तृतीय क्रमांक रूपये ३५१ व स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक, सूर्यनमस्कार (सांघिक) प्रथम क्रमांक रुपये ३००१, द्वितीय क्रमांक रुपये २००१, तृतीय क्रमांक–रूपये १००१, उत्तेजनार्थ रुपये ३०१ स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप आहे. सर्व स्पर्धांसाठी प्रवेश निशुल्क आहे. स्पर्धे साठी नावे पाठवण्याची अंतिम मुदत २० जानेवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. अशी माहिती स्पर्धा प्रमुख तथा दादा चौधरी मराठी शाळेचे चेअरमन सुमतीलाल कोठारी यांनी दिली आहे. माहितीसाठी ९५५२८६२९०९, ७८२१९१५८९६, ७४९८७६५१२६, ८७६६७९७०३९.

## खुल्या गटातील निमंत्रित क्रिकेट स्पर्धेसाठी १९ जानेवारीला निवड चाचणी

नगर – महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून होणाऱ्या खुल्या (ओपन) गटासाठी निमंत्रित क्रिकेट स्पर्धेसाठी (मुले) अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशन निवड चाचणी होणार आहे

खुल्या (ओपन) गटातील निवड चाचणी १९ जानेवारी या दिवशी सकाळी ८ ते १० या वेळेत ग्रामीण भागातील खेळाडू तसेच शहरी भागातील खेळाडू यांची एकाच दिवशी दोघांची निवड चाचणी सोबतच वाडीया पार्क मैदान, बॅडमिंटन हॉल, शेजारी, अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशन अकादमीच्या मैदानावर होईल. (रजिस्ट्रेशन फी २०० रुपये राहिल)

जिल्ह्यातील खेळाडूंनी या निवड चाचणीसाठी वेळेवर उपस्थित रहावे, असे जिल्हा क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष अरूण जगताप यांनी सांगितले.






श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्ट व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या वतीने केडगाव एमआयडीसी येथील वासन टोयोटा शोरुम येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना आ. संग्राम जगताप. शेजारील छायाचित्रात गरजू रुग्णांची तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी दिसत आहेत.

# व्यवसायाला समाजसेवेची जोड असावी

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; केडगावच्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला प्रतिसाद, श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम

नगर – सामाजिक बांधिलकी जोपासताना व्यवसायाला समाजसेवेची जोड असवी. सर्वसामान्यांना कुठेतरी मदत केली पाहिजे, या भावनाने वासन व आहुजा परिवार योगदान देत आहे. फक्त आर्थिक दृष्टीकोन न ठेवता समाजातील दुर्बल घटकांना आधार देण्यासाठी त्यांनी घेतलेले उपक्रम प्रेरणादायी आहे. वासन व आहुजा परिवाराने व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रात आपले नाव निर्माण केले आहे. कोरोना महामारीत घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्ट व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या वतीने केडगाव एमआयडीसी येथील वासन टोयोटा शोरुम येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. वासन उद्योग समूहाचे चेअरमन विजय वासन यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी जगताप बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार शिवाजी कर्डिले, अक्षय कर्डिले, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप, घर घर लंगर सेवेचे हरजितसिंह वधवा, शोरुमचे जनक आहुजा, रवींद्र बक्षी, सुमतीलाल कोठारी, राजेश भंडारी, सुजित काकडे, दामोदर भटेजा, जय रंगलानी, अमोल गाडे, जितू गंभीर, राजेश कातोरे, हनुमंत कातोरे, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, वासन टोयोटाचे बी.एस. हर्षा, सतोष जोगदंड, आनंदऋषी हॉस्पिटलचे डॉ. आनंद छाजेड, अनिश आहुजा, नेत्रदूत जालिंदर बोरुडे, राजेश सचदेव, गुलशन कंत्रोड, राकेश गुप्ता आदी उपस्थित होते.

आमदार शिवाजी कर्डिले म्हणाले की, वासन परिवार संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असताना राज्यातील अनेक युवकांना रोजगार देण्याचे काम केले. दरवर्षी नेत्र तपासणी शिबिर घेऊन हजारो गरजू घटकांना दृष्टी देण्याचे कार्य केले जात आहे. शिबीराच्या माध्यमातून वंचितांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे काम सुरु आहे. तर कोरोना काळातही नाशिक मध्ये अन्न छत्र चालवून गरजूंना आधार दिला. तर नगर शहरातील लंगर सेवेला त्यांनी केलेले सहकार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीत मताधिक्याने निवडून आल्याबद्दल आम दार शिवाजी कर्डिले व आमदार संग्राम जगताप यांचा नागरी सत्कार करण्यात आला. अरुण जगताप यांनी शिबिराला भेट देऊन दरवर्षी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

यामध्ये संध्याकाळ पर्यंत तब्बल ४११ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तर गरजूंना अल्पदरात नंबरच्या चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तर ६१ रुग्णांवर अल्पदरात आनंदऋषीजी नेत्रालयात मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. दिवसभर चाललेल्या शिबिरात नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन कोमल पोळ यांनी केले. आभार अनिश आहुजा यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वासन टोयोटाचे सहकारी दिपक जोशी, प्राची जामगावकर, प्रविण जोशी, अविनाश लाळगे, समीर पवार यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच खेळाकडे वळावे

## आनंद कटारिया यांचे प्रतिपादन

नगर – शाळेत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विविध खेळाचे धडे देखील दिले जात आहे. शाळेचे रानवारा येथे नव्याने सुरु होत असलेल्या कॅम्पसमध्ये खेळाडूंच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. शाळेतील खेळाडू विविध स्पर्धेत आपली गुणवत्ता सिध्द करत आहे. या क्रीडा संकुलच्या माध्यमातून खेळाडूंना चालना मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये दिवसेंदिवस मैदानी खेळाचे महत्त्व कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच खेळाकडे वळावे, यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याच कार्य सुरु असल्याचे आनंद कटारिया यांनी सांगितले.



जेएसएस स्कूलच्या देव सत्रे याने महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्वांदो स्पर्धेत कास्यपदक पटकाविले.

### जेएसएस स्कूलच्या देव सत्रे याने महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्वांदो स्पर्धेत पटकाविले कास्य पदक

नुकतेच झालेल्या महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्वांदो चॅम्पियनशिप स्पर्धेत जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जेएसएस) स्कूलचा विद्यार्थी देव किशोर सत्रे याने कास्यपदक पटकाविले.

या विद्यार्थ्याचा शाळेत स्कूलचे प्राचार्य आनंद कटारिया यांनी सत्कार केला. याप्रसंगी शालेय शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

वाडियापार्क क्रीडा संकुल येथे महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्वांदो स्पर्धा उत्साहात पार पडली.

यामध्ये शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते. देव सत्रे याला सचिन मरकड व शाळेचे क्रीडा शिक्षिका आरती राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

# छावनी परिषद शाळेच्या मसीरा शेखच्या उपकरणाची जिल्हास्तर प्रदर्शनासाठी निवड

भिंगार – अहिल्यानगर तालुकास्तरीय विज्ञान, गणित, पर्यावरण प्रदर्शन नुकतेच झाले. या विज्ञान संमेलनातून इयत्ता ६ वी ते ८ वीच्या गटातून छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेच्या कु. मसीरा हुजैफा शेख हिच्या संसाधन व्यवस्थापन विषयाअंतर्गत पाण्याची पातळी दर्शक या उपकरणाची अकोले येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय प्रदर्शनाकरिता निवड झाली आहे.



या गणित–विज्ञान प्रदर्शनामध्ये तीन गटांचे तब्बल २०० पेक्षा जास्त उपकरणे ठेवण्यात आली होती. तिला शाळेतील शिक्षिका सीमा चोभे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या यशाबद्दल छावनी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, मनोनित सदस्य वसंत राठोड, केंद्रप्रमुख संजय धामने, कार्यालय अधिक्षिका स्नेहा पारनाईक, मुख्याध्यापक संजय शिंदे, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे आदींनी अभिनंदन केले आहे.




# अशी टिकवा पोषणमूल्यं

आहारतंत्र

पोषणमूल्य मिळवण्यसाठी फक्त भाज्या खाऊन भागत नाही तर त्या योग्य पद्धतीने शिजवणंही गरजेचं असतं. भाज्यांमधली अधिकाधिक पोषणमूल्यं टिकवून ठेवण्यासाठी काय करायला हवं याविषयी...

भाजी चिरण्याच्या पद्धतीकडे लक्ष द्या. भाजी चिरण्याच्या पद्धतीमुळेही त्यातली पोषणमूल्य नष्ट होऊ शकतात. हे टाळण्यासाठी भाजी धुवून मगच चिरावी. काहीजण आदल्या दिवशी भाजी चिरून दुसऱ्या दिवशी वापरतात. ही पद्धत चुकीची



आहे. मधल्या काळात भाजीतली बरीच पोषणमूल्यं नष्ट होतात. भाजी करण्याआधी चिरून घ्या. भाजीचे फार छोटे तुकडे करू नका. थोडे मोठे तुकडेच ठेवा. भाजी शिजण्याचा वेळही महत्त्वाचा आहे. भाजी जितकी जास्त वेळ उष्णतेच्या संपर्कात राहिल तितकी अधिक पोषणमूल्यं नष्ट होतील. भाजी शिजवताना पाण्याचा फार वापर करू नका.

जास्त पाण्यामुळेही त्यातली पोषणमूल्यं नष्ट होऊ शकतात. भाज्या मंद आचेवर आणि शक्यतो झाकून शिजवा.

# बरा झाल्यानंतर पुन्हा होऊ शकतो कर्करोग

आरोग्य विशेष

कर्करोगाच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. आजकालची बदलती जीवनशैली, अनहेल्दी खाणे, वाईट सवयींमुळे अनेकांना विविध आजारांनी ग्रासले आहे. कर्करोग हा एक जीवघेणा आजार आहे. या आजारावर जगभरात संशोधन होत आहे. स्तनाचा कर्करोग, फुफ्फुसाचा कर्करोग इत्यादी कर्करोगाचे अनेक प्रकार आहेत. हा आजार एक आव्हानात्मक आजार आहे. त्यात जीवाला धोका असतो. स्तनाचा कर्करोग हादेखील एक प्रकारचा कर्करोग आहे, ज्याची प्रकरणे जगभरात वाढत आहेत.


जगभरातील आरोग्य विभागांमध्ये कर्करोगाबाबत अभ्यास सुरू आहे. नुकत्याच झालेल्या एका संशोधनात असे आढळून आले आहे, की कर्करोगाचे काही प्रकार आहेत, जे पहिल्या उपचारात बरे झाल्यानंतर काही वर्षांत पुन्हा सक्रिय होऊ शकतात. हे प्रामुख्याने स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांमध्ये होते. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठात हे संशोधन करण्यात आले. डॉ. गॅरी लुकर यांच्या नेतृत्वाखाली ब्रेस्ट कॅन्सरवर हे संशोधन करण्यात आले. त्यांच्या संशोधनात त्यांनी हे अधोरेखित केले आहे, की काही प्रकारचे स्तन कर्करोग ज्यावर आधी उपचार केले गेले आहेत, ते काही वर्षांनी पुन्हा सक्रिय होऊ शकतात.

*** कशामुळे पुन्हा होतो कर्करोग?**

कर्करोगाच्या उपचारादरम्यान, लोक बहुतेकदा असा विचार करतात, की ते रोगापासून बरे झाले आहेत; परंतु या प्रकारच्या स्तनाच्या कर्करोगात, इस्ट्रोजेन रिसेप्टर-पॉझिटिव्ह रुग्णांच्या कर्करोगाच्या पेशींमध्ये असामान्य वाढ होते. या कर्करोगाच्या पेशी उपचारानंतरही अस्तित्वात राहतात. त्यामुळे काही वर्षांनी हा आजार पुन्हा होतो.

***'जीआयव्ही' म्हणजे काय?**

संशोधनाने 'जीआयव्ही' किंवा 'गिर्डीन' नावाचे प्रमुख प्रोटीन ओळखले आहे. ते कर्करोगाच्या पेशी जिवंत ठेवण्यास मदत करतात. हे संशोधन



अद्याप पूर्णपणे योग्य मानले जात नाही. यावर अजून अभ्यासाची गरज आहे; मात्र काही गोष्टी पाळल्या पाहिजेत. त्यामुळे आपण कॅन्सरसारख्या आजारांपासून दूर राहू शकतो.

**- डॉ. सतीश सोनवणे**

# बटाटा चिप्स खाताय, सावधान!

बटाटा चिप्स म्हटले की अनेकांना खाण्यापासूम मोह आवरता येत नाही. सण असो किंवा कोणताही प्रसंग; बटाटा चिप्स हे मेन्यूमध्ये ठरलेले असतात. हा असा पदार्थ आहे, जो लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतो. बाजारात बटाटा चिप्स अनेक रंगीबेरंगी पॅकेट्समध्ये उपलब्ध असून ते चवीला चवदार असले, तरी आरोग्यासाठी फारसे फायदेशीर नाहीत. पॅकेट चिप्स आरोग्यासाठी हानिकारक असतात.

या संदर्भात अनेक संशोधने यापूर्वीच समोर आली आहेत. आता एका नवीन संशोधनात असे दिसून आले आहे, की पॅकेज केलेले बटाटा चिप्स लोकांसाठी देखील हानिकारक आहेत. एका मोठ्या कंपनीने यावर कठोर कारवाईदेखील केली आहे. पॅकेज केलेल्या बटाटा चिप्समध्ये जास्त प्रमाणात कॅलरीज, मीठ, सोडा आणि फॅटस्? असतात. या गोष्टींमुळे चिप्स आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. यामुळे वजन वाढू शकते.

एका वृत्तानुसार, चिप्सचा प्रसिद्ध ब्रँड लेजने त्याच्या सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या फ्लेवरच्या चिप्सच्या विक्रीवर बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. 'युनायटेड स्टेटस् फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन'(एफडीए) ने फ्रिटो-ले यांना त्यांच्या 'क्लासिक बटाटा चिप्स' परत मागवण्याचे आदेश दिले आहेत. या चिप्समध्ये अशी ॲलर्जीन आढळून आली आहेत, जी पॅकिंगमध्ये घोषित केलेली नाहीत. हे प्रकरण ओरेगॉन आणि वॉशिंग्टन राज्यांमध्ये वितरीत केलेल्या काही चिप्सशी संबंधित आहे. हे दुधाची ॲलर्जी असलेल्या लोकांना हानी पोहोचवू शकते. मुलांमध्ये ही ॲलर्जी सामान्य आहे.

१६ डिसेंबर रोजी, फ्रिटो-लेने ओरेगॉन आणि वॉशिंग्टनमध्ये विकल्या गेलेल्या १३-औंस लेच्या क्लासिक बटाटा चिप्स परत मागवण्याची घोषणा केली. काही चिप्समध्ये दूध असल्याचे आढळून आले, जे पॅकिंगवर घोषित करण्यात आले नव्हते. ही चूक विशेषतः दुधाची ॲलर्जी किंवा लैक्टोजच्या त्रासाने ग्रस्त असलेल्या ग्राहकांसाठी गंभीर असू शकते.

'एफडीए' च्या मते, अन्न ॲलर्जीन हे दरवर्षी रिकॉल होण्याचे एक प्रमुख कारण आहे. मोठ्या प्रमाणातील उत्पादनामध्ये सातत्यपूर्ण सुरक्षा मानके राखणे किती आव्हानात्मक असू शकते, हे देखील या घटनेने अधोरेखित केले आहे.

*** या ॲलर्जीची लक्षणे काय?**
- मळमळ किंवा उलट्या
- पोटदुखी
- अतिसार
- खाज सुटणे.
- ओठ, जीभ किंवा घशाला मुंग्या येणे किंवा सूज येणे
- छातीत घट्टपणा.
- श्वास लागणे
- अन्न गिळण्यात अडचण.

*** दुधाच्या ॲलर्जीचा परिणाम**

दुधाची ॲलर्जी असल्यास, दुधाच्या संपर्कात आल्यानंतर शरीर इम्युनोग्लोबुलिन ई बनवून प्रतिक्रिया देते. ज्यानंतर अँटीबॉडीज ॲलर्जी असलेल्या लोकांमध्ये प्रतिकारशक्ती वाढवण्याचे काम करतात, हे ॲन्टीबॉडीज शरीरात दूध घेतल्यानंतर नकारात्मक प्रतिक्रिया देतात. यामुळे शरीरात विविध प्रकारच्या आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्वचेची प्रतिक्रिया, श्वास घेण्यात अडचण, हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होतो.

*** पॅकेट चिप्सचे इतर तोटे**
- कॅलरीज वाढल्यामुळे वजन वाढते.
- सोडियमचे प्रमाण वाढल्याने रक्तदाब, हृदयविकार, किडनीच्या आजाराचा धोका वाढू शकतो.

अस्वास्थ्यकर चरबीमुळे कोलेस्टेरॉल वाढते.
पॅकेट चिप्स हे वृद्धत्वाचे कारण असू शकते.



**- डॉ. मेघा दळे**

# गर्भनिरोधक गोळ्यांचे लाभ


खास बात

गर्भधारणा टाळण्यासाठी गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर केला जातो. या गोळ्यांमुळे वजन वाढणं, वंध्यत्व अशा समस्या निर्माण होतात, असं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात हे सर्व गैरसमज आहेत. गर्भधारणा रोखण्यासोबतच गर्भनिरोधक गोळ्यांचे इतरही अनेक लाभ आहेत. याबाबत फारसं बोललं गेलेलं नाही. या लाभांविषयी जाणून घेऊ.

गर्भनिरोधक गोळ्यांच्या योग्य सेवनामुळे नको असणारी गर्भधारणा टाळता येते. यामुळे गर्भपात रोखणं शक्य होतं. यासोबतच गरोदरपणाशी संबंधित गुंतागुंतींचं प्रमाणही कमी करता येतं. या गोळ्यांमुळे मासिक पाळी नियमित होऊ शकते. ताणतणाव, प्रदूषण, आहाराच्या चुकीच्या सवयी अशा अनेक कारणांमुळे महिलांमध्ये मासिक पाळीची संबंधित समस्या वाढीस लागल्या आहेत.

गर्भनिरोधक गोळ्यांमुळे हे चक्र नियमित होऊ शकतं. मासिक पाळीदरम्यान काही महिलांना बराच त्रास होतो. पोटात गोळे येणं, अतिरक्तस्राव अशा समस्याही निर्माण होतात. गर्भनिरोधक गोळ्यांमुळे मासिक पाळीतल्या वेदना कमी होऊ शकतात.

काही महिलांमध्ये एंडोमेट्रिओसिसची समस्या निर्माण होते. यात काही टिश्यू



गर्भाशयाच्या बाहेर आल्यामुळे तीव्र वेदनांना सामोरं जावं लागतं. गर्भनिरोधक गोळ्या या टिश्यूंची वाढ रोखू शकतात. गर्भाशयात गाठी होण्याचं प्रमाणही कमी होतं. पॉलिसिस्टिक ओव्हरियन सिंड्रोम म्हणजे पीसीओएस. सध्याच्या काळात बऱ्याच महिलांना पीसीओएसची समस्या भेडसावते. गर्भनिरोधक गोळ्यांमुळे हा त्रास कमी होऊ शकतो.

या गोळ्यांमुळे शरीरातल्या अँड्रोजेनचं प्रमाण कमी होऊ शकतं. अँड्रोजेन या हार्मोनमुळे शरीरातल्या तैलग्रंथी सक्रिय होतात आणि तेलनिर्मितीचं प्रमाण वाढतं. मात्र गर्भनिरोधक गोळ्यांमुळे अँड्रोजेनचं प्रमाण कमी झाल्याने तैलनिर्मितीची प्रक्रिया मंदावते आणि मुरूमांचं प्रमाण कमी होतं. या गोळ्यांमुळे तुमची त्वचाही तजेलदार दिसू लागते. गर्भनिरोधक गोळ्यांमध्ये एस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टिन हे घटक असतात. त्यामुळे मुरूमांची समस्या असणाऱ्यांना गर्भनिरोधक गोळ्या घेण्याचा सल्ला दिला जातो.

गर्भनिरोधक गोळ्यांमुळे गर्भाशयाच्या कॅन्सरचा धोका कमी होतो.

अधिकाधिक काळपर्यंत या गोळ्या घेणाऱ्या महिलांमध्ये गर्भाशयाच्या कॅन्सरचा धोका कमी होत असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. गर्भनिरोधक गोळ्यांमुळे या कॅन्सरचा धोका ४० टक्क्यांनी कमी होतो, असं एक संशोधन सांगतं. काही महिलांना मासिक पाळीदरम्यान खूप रक्तस्राव होतो. यामुळे शरीरातल्या लोहाचं प्रमाण कमी होतं आणि या महिला ॲनिमिक होतात. गर्भनिरोधक गोळ्यांमुळे रक्तस्रावावर नियंत्रण मिळवता येतं आणि ॲनिमियाचा धोकाही बऱ्याच प्रमाणात कमी होतो. त्यामुळे गर्भनिरोधक गोळ्यांबाबतचे गैरसमज दूर करायला हवेत.

**- डॉ. प्रसन्न नेने**

# ब्राउन साखर का पांढरी साखर?

आपण कुठे चुकतो?

ब्राउन राईस, ब्राउन ब्रेड किंवा ब्राउन शुगर आरोग्याच्या दृष्टीने अधिक लाभदायी ठरतात, असं म्हटलं जातं. पांढऱ्या साखरेच्या तुलनेत ब्राउन साखर खाण्यावर अनेकांचा भर असतो. पण साखरेच्या या दोन प्रकारांमध्ये काही फरक असतो का? ब्राउन साखर खरंच अधिक पोषक असते का? जाणून घेऊ.

ब्राउन साखरेवर पांढऱ्या साखरेच्या तुलनेत कमी प्रक्रिया केली जाते. ब्राउन साखरेवर अधिक प्रक्रिया केल्यानंतर पांढऱ्या साखरेची निर्मिती होते. साखरेच्या दोन्ही प्रकारांमध्ये कमी अधिक प्रमाणात सारखीच पोषणमूल्यं असतात. ब्राउन साखरेवर कमी प्रक्रिया झाल्यामुळे त्यात कॅल्शियम, पोटॅशियमसारखी काही खनिजं असतात तर पांढऱ्या साखरेत कोणतीही पोषणमूल्यं, जीवनसत्त्वं, खनिजं नसतात. पांढरी साखर ही पूर्णपणे सूक्रोज असते.



या दोहोंमधला मुख्य फरक म्हणजे त्यांची चव. ब्राउन साखर अधिक चविष्ट असते. चमचाभर ब्राउन शुगर घालून प्यायलेलं पेयं अधिक आरोग्यदायी असतं हा निव्वळ गैरसमज आहे. ही साखरही पांढऱ्या साखरेइतकीच धोकादायक असते. साखरेच्या दोन्ही प्रकारांचे आपल्या शरीरावर सारखेच परिणाम होतात. त्यामुळे ब्राउन शुगरही प्रमाणातच खायला हवी.

# कशी टाळायची पोटफुगी?

आयुर्वेद आणि विकार

काहीही खाल्ल्यानंतर किंवा जेवल्यानंतर अनेकांना पोट फुगल्यासारखं वाटतं. गॅसचा त्रास होतो. साधं अन्न खाल्ल्यानंतरही पोट खूप जड होतं. छातीत जळजळ जाणवते. याला पोट फुगणं असं म्हणतात. ही समस्या अनेक कारणांमुळे निर्माण होते. बद्धकोष्ठता, गॅस, अतिखाणं, वजन वाढणं, मासिक पाळी, पोटातला जंतूसंसर्ग अशा अनेक बाबी याला कारणीभूत ठरू शकतात. या विकारावर आयुर्वेदिक उपचार करता येतील.

पोटफुगीची समस्या सोडवण्यासाठी ग्लासभर गरम पाणी पिता येईल. ही समस्या कमी करण्याचा हा एक प्रभावी उपाय आहे. गरम पाण्यामुळे पोटफुगीची समस्या कमी होतेच शिवाय पोटाच्या इतर समस्यांवरही हा उपाय प्रभावी ठरू शकतो.



पोटाच्या अनेक समस्यांवर हिंग प्रभावी ठरतं. २०० मिलीलीटर पाण्यात १०० ग्रॅम हिंग घालून उकळून घ्या. हे पाणी प्यायल्याने पोटाच्या समस्या दूर होऊ शकतात. या पाण्यात मेथीदाण्याची पूडही घालता येते. या पाण्यात आल्याचे तुकडे घालून जेवणानंतर प्या. आराम पडतो. पोटाच्या समस्या टाळण्यासाठी मोसमी भाज्या आणि फळं खाण्यावरही आयुर्वेद भर देतं. यामुळे पचनक्रिया सुधारते. आपल्या शरीराला वातावरणानुसार खाद्य हवं असतं. त्यामुळे प्रत्येक हंगामातली फळं आणि भाज्या खाव्यात.

# स्तनांच्या कॅन्सरविषयी...

व्याधी विचार

जगभरातंच स्तनांच्या कॅन्सरचं प्रमाण वाढत आहे. या कॅन्सरला अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात. या कॅन्सरबाबतही बरेच गैरसमज आहेत. डिओचा वापर, चुकीच्या अंतर्वस्त्रांचा वापर अशा अनेक बाबी याला कारणीभूत ठरतात, असं म्हटलं जातं. स्तनांच्या कॅन्सरबाबतची जागरूकता वाढते आहे. मात्र याबाबत मोठ्या प्रमाणावर अज्ञान आहे. या गैरसमम जांचा आपला आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. स्तनांच्या कॅन्सरबाबतचं अज्ञान दूर करण्याचा हा एक प्रयत्न...

स्तनांचा कॅन्सर विशिष्ट वयानंतर उद्भवतो, असं अनेकांना वाटतं. पण प्रत्यक्षात स्तनांच्या कॅन्सरचा आणि वयाचा काहीच संबंध नसतो. हा विकार कोणत्याही वयोगटातल्या महिलेला होऊ शकतो. २३ वर्षांच्या तरुणीपासून ५० वर्षांच्या प्रौढ महिलेपर्यंत प्रत्येकीला ब्रेस्ट कॅन्सरचा तितकाच धोका असतो. त्यामुळे स्तनांमधल्या कोणत्याही बदलाकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं काही. स्तनांमध्ये एखादी गाठ आढळली किंवा स्तनांच्या त्वचेमध्ये बदल जाणवला तर लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्या.



ब्रेस्ट कॅन्सरचं निदान झाल्यानंतर कोणत्याही महिलेला मोठा धक्का बसतो. या विकाराबाबत अनेक गोष्टी तुमच्या कानी येतील. पण अशा गोष्टींवर फार विश्वास ठेऊ नये. कॅन्सरवरच्या उपचारांचा प्रत्येकावर होणारा प्रभाव वेगळा असतो. त्यामुळे घाबरून जाऊ नये.

केमोथेरेपीबद्दल अनेकांच्या मनात शंका असते. मनात एक प्रकारची साशंकता असते. पण केमोथेरेपी धोकादायक असतेच असं नाही. प्रत्येकाला केमोच्या दुष्परिणामांना सामोरं जावं लागतंच असं नाही.


ब्रेस्ट कॅन्सरचं निदान झाल्यानंतर दुसरं मत घ्यायला विसरू नका. दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. काही वेळा ब्रेस्ट कॅन्सरच्या लक्षणांचं चुकीचं निदान होऊ शकतं. काही लक्षणं ब्रेस्ट कॅन्सरसारखी असली तरी ती कॅन्सरला कारणीभूत ठरतातच असं नाही. त्यामुळे निदान झालं तरी लगेच घाबरून जाऊ नका.

वेळेत निदान झालं तर स्तनांचा कॅन्सर बरा होऊ शकतो. या कॅन्सरचे जवळपास ९५ टक्के रुग्ण पूर्णपणे बरे होऊ शकतात. त्यामुळे स्तनांच्या कॅन्सरला धीराने सामारं जाणं गरजेचं आहे.

**- डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

## एचआयव्हीवर प्रभावी उपाय!

नवसंशोधन




एचआयव्ही विषाणूंची लागण हा अत्यंत घातक असा विकार आहे. या विकार जडल्यानंतर त्यासह जगावं लागतं. एचआयव्ही पूर्ण बरा होऊ शकत नाही. एचआयव्हीवरच्या उपचारांसाठी बरंच संशोधन होत असतं. एचआयव्हीवर प्रभावी उपचार सापडल्याचा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. यासाठी उंदरांवर काही चाचण्या करण्यात आल्या. या चाचण्यांचे सकारात्मक निष्कर्ष समोर आले आाहेत. एचआयव्हीवरच्या उपचारांसाठी दोन पद्धतींचं एकत्रीकरण करण्यात आल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. त्यामुळे येत्या काळात एचआयव्ही पूर्णपणे बरा होऊ शकेल. एचआयव्हीचा वाढता प्रसार रोखण्यासाठी ही बाब प्रभावी ठरू शकते. यामुळे अनेकांना दिलासा मिळू शकतो.

## स्कॅलिंगची गरज आहे का?

दंतारोग्य

दातांच्या आरोग्यासाठी आपण विविध उपचार घेतो. मात्र काही उपचारांची निवड काळजीपूर्वक करणं गरजेचं असतं. डेंटिस्टकडे गेल्यानंतर स्कॅलिंगचा सल्ला मिळतो. नियमित तपासणीदरम्यान स्कॅलिंग केलं जातं. पण स्कॅलिंग करण्याची गरज नसू शकते. त्यामुळे स्कॅलिंगची गरज नाही असं तुम्हाला वाटत असेल तर दंततज्ज्ञांना तसं स्पष्टपणे सांगा. या प्रक्रियेची गरज का आहे, ते समजून घ्या. स्कॅलिंगची गरज नसेल तर ते करू नका. दात स्वच्छ असतील तर स्कॅलिंगची गरज नसते.



## रंगांधळेपणाविषयी...

डोळ्यांचं आरोग्य

काही लोकांना विशिष्ट रंग पहाताना अडचणी येतात. काही प्रसंगी तुम्ही एका पायात लाल आणि एका पायात हिरवा मोजा घालून मोकळे होता. पण हा घाई-गडबडीत झालेला गोंधळ नसतो. रंगांधळेपणामुळे असं होऊ शकतं. अमेरिकेत ७६ नागरिकांपैकी एकाला रंगांधळेपणा असतो. हा अनुवंशिक विकार आहे. आई-वडिलांकडून हा रोग मुलांपर्यंत पोहोचतो. महिलांपेक्षा पुरूषांमध्ये ही समस्या अधिक प्रमाणात आढळते. या विकारात डोळ्यांच्या मागे असणाऱ्या पेशींचं नुकसान होतं आणि हा त्रास निर्माण होतो. त्यामुळे रंग ओळखताना त्रास होत असेल तर लगेच तपासणी करून घेणं गरजेचं आहे.




## लाभ पपईच्या पानाच्या रसाचे...

आजीबाईंचा बटवा

पपई या फळाचे गुण आपण जाणतो. पण त्याची पानंही खूप उपयुक्त असतात. पावसाळ्यात डेंग्यू विकाराचं प्रमाण वाढतं. या विकारात प्लेटलेट्स कमी होतात. पण पपईच्या पानांच्या रसामुळे प्लेटलेट्सची संख्या वाढते. पपईच्या पानांचा रस खूप गुणकारी आहे. पपईच्या पानांचा रस काढणं शक्य नसलं तरी तुम्ही सप्लिमेंट म्हणून तो घेऊ शकता. पपईच्या पानांचा रस काढण्याआधी पानं नीट धुवून घ्या. त्याचे देठ काढून टाकता येतील. कोबीप्रमाणे ही पानंही चिरून घ्या. पाणी उकळून घ्या. हे पाणी थंड झाल्यानंतर मिक्सरमध्ये घाला. त्यात पपईची पानं घाला आणि रस करून घ्या. या रसाची चव थोडी कडवट असू शकते. पण तो खूपच गुणकारी असतो.



**कामासाठी मुले पाहिजेत**
जागा – २
दाळमंडई, अ.नगर.
9028544926

**Bajaj, Prestige सर्व्हिस सेंटरसाठी**
लेडिज कॉम्प्युटर ऑपरेटर
**पाहिजेत**
आनंदी बाजार चौक, दादाचौधरी शाळेच्या मागे, अहमदनगर.
9225948666

**मराठी व इंग्रजी टायपिंगसाठी लेडिज/जेन्टस् त्वरित पाहिजेत**
(कमीत कमी १ वर्षाचा अनुभव आवश्यक)
7821010661

**FMCG मधील सुपर स्टॉकिस्ट डिस्ट्रिब्युटरशिप घेणे आहे.**
: संपर्क :
8983042122

**हॉल विकणे आहे**
मोनालिसा हाईटस् कराचीवाला बेकरीसमोर सर्जेपुरा रोडटच पहिल्या मजल्यावरील १२०० स्के. फूट हॉल सर्व सोयी-सुविधांयुक्त हॉल योग्य किंमतीमध्ये विकणे आहे.
8983032339
9822500956

**भाड्याने देणे**
शिवनेरी चौक, स्टेशन रोड येथील
1 BHK
तळ मजल्यावरील घर काही अटी शर्तीवर त्वरित भाड्याने देणे आहे. एजंट क्षमस्व !
9890697593

**दुकान विकणे**
सर्जेपुरा चौकात
9890324598


**विकणे आहे**
बालिकाश्रम रोडवर आर्यन गार्डनसमोर प्रशस्त बंगला सर्व-सोयीनी युक्त ३००० sq ft प्लॉट व २५०० बांधकाम योग्य किंमत आल्यास विकणे आहे
88307 10400

**अहमदनगर एमआयडीसी येथे इलेक्ट्रिकल प्रॉडटक्ट उत्पादन युनिटमध्ये भरती चालू**
* ITI Diploma/Eng (Electronic/Electrical/Mechanical) : १० जागा
* MBA (Marketing/Finance) : ५ जागा
* Accounting : २ जागा * Labour : १५ जागा
वरील सर्व जागेसाठी (मेल/फिमेल)
पत्ता : जी.एस.इंडस्ट्रीज, प्लॉट क्र.१५, क्र.२२९/३ निंबळक बायपास, एमआयडीसी, अहमदनगर-४१४१११
मो : 9511810563 Email - info@gsind.co.in

**पाहिजेत**
मानव विकास परिषद रिसेप्शनसाठी (मुलगी/महिला)
संगणक ज्ञान आवश्यक मराठी, हिंदी, इंग्रजी टायपिंग असणे आवश्यक.
8605497333

**दीप गार्ड पावर सिस्टम**
सर्व कंपनीचे इन्व्हर्टर व बॅटरी रिपेअर करुन मिळेल.
बॅटरी वॉटर टाकून मिळेल
घरपोहोच सेवा
जुने इन्व्हर्टर बॅटरी विकत घेतो व विकतो
9260000613

**FOR SALE AT MEHERABAD**
Spacious Bungalow for Sale at Meherabad.
Plot Area : 15000 Sq. ft. (Collector N.A.).
Built-up Area : About 5000 Sq. ft.
Distance from MPR : 2 Minutes Walking.
Distance from Meher Baba's Tomb : 7 Minutes Walking.
Situated at high point overlooking Nagar Town surroundings.
Contact : 98211 34972.

**Plywood, Laminates, Veneers**

Teakwood, Pinewood, Burma teak, Ash wood, B.T.C. Patti, Moulding, Railing, Pillars, Brackets, Wooden Flooring
**PITRODA SALES**
Gulmohar Road Savedi, A.Nagar
Cont. - 9823704000, 9623704000

**पाहिजेत**
अकौंटंट असिस्टंट ........> जागा-२
पात्रता: ग्रॅज्युएट, टेली प्राईमचे व GST चे व एक्सेलचे संपूर्ण ज्ञान तसेच अकौंटिंग कामाचा ५ वर्षांचा अनुभव आवश्यक
स्टोअर्स किपर ........> जागा-२
पात्रता: ग्रॅज्युएट, प्रतिष्ठित संस्था मध्ये तत्सम कामाचा ३ वर्षांचा अनुभव तसेच टेली व एक्सेल मध्ये कामाचा ज्ञान आवश्यक
इच्छुकांनी संपूर्ण माहिती व कागदपत्रासह दि. १९ रविवार ते २१ मंगळवार पर्यंत दु. ३ ते ५ या वेळेत समक्ष भेटावे, आकर्षक पगार दिले जाईल
AVON FLEXIBLES प्लॉट नं. W-36/C/1, MIDC, अहमदनगर संपर्क -9420031482

**त्वरीत पाहिजेत**
जगदंब फाउंडेशनसाठी HR/मॅनेजर पाहिजे
पात्रता - नगर शहरातील पदवीधर किंवा उच्च पदवीधर पुरुष Marketing, Sales, Team Leader कामाचा अनुभव पाहिजे.
पगार 17 ते 20 हजार व इन्सेन्टिव्ह
7447785910

**गाळे भाड्याने देणे आहे**
सिध्दीबागेजवळ ऑफिस, क्लिनिक, ओपीडी व इतर व्यवसायासाठी गाळे सर्व सोयी-सुविधांयुक्त भाडेतत्वावर देणे आहे.
- संपर्क -
Mo. 9270570699

**पाहिजेत**
शॉप ऑपरेटर/मॅनेजर
• किराणा दुकानात काम करण्या करिता
• अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.
• बायोडाटा सह समक्ष भेटावे.
सुयश कॉर्नर
तेलीखुंट, अहमदनगर
88889 61951

**पाहिजेत**
सेल्समन २
फर्निचर, इलेक्ट्रॉनिक व होम अप्लायन्स ह्या क्षेत्रात अनुभवीना प्राधान्य
महिला कामगार
दुकानात साफ सफाई कामासाठी २
बायोडाटा सह समक्ष भेटावे
विजय ट्रेडिंग कं.
तेलीखुंट, पॉवर हाऊस समोर, अ.नगर. मो. ७५१७४ ०४५३०


## ॥ दशक्रिया विधी ॥



नसलीस जवळ तू
तरी तुझा भास आहे,
येशील परतूनी तू
आजही डोळ्यांना आस आहे

कळविण्यात अत्यंत वाईट वाटते की, आमची आई
**स्व. प्रा. पुष्पाताई मोहनराव मरकड**
(संस्थापक संचालिका, अंबिका महिला सहकारी बँक, अ.नगर)
यांचे शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ रोजी दु:खद निधन झाले.

दशक्रियाविधी - सोमवार दि. २० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ वा. ठिकाण - अमरधाम, नालेगांव, अहिल्यानगर.

यावेळी ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल, मदन महाराज संस्थान, कडा यांचे प्रवचन.

आपले दु:खांकित
किशोर मोहनराव पा. मरकड नितीन मोहनराव पा. मरकड
समस्त मरकड पाटील परिवार
। चैतन्य पब्लिसिटी व ट्रॅव्हल्स् । ओंकार ट्रॅव्हल्स् ।



## असा समर्पित कार्यकर्ता पुन्हा होणे नाही....

**योगेश मुनोत....आमचा गुड्डू...**

आमच्या मंडळाचा खंदा कार्यकर्ता..
अगदी घरच्यासारखा सामाजिक कार्यात उत्साहाने सहभागी होणारा..
मंडळाच्या प्रत्येक सभासदाला आपलेसे करणारा...
गरजवंताच्या मदतीला धावून जाणारा...
सेवाकार्यात नेहमीच अग्रेसर असणारा..
धार्मिक वृत्तीचा.. साधू-साध्वीजींच्या सेवेत रममाण होणारा, आमचा गुड्डू....
तुझ्या स्मृती कायम आमच्या हृदयात असणार...

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

**श्री जय आनंद महावीर युवक मंडळ,** नवीपेठ, अहिल्यानगर
सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व देणगीदार




**आपण आजारी नसतानाही**
हात-पाय गळून जाणे. कामाचा उत्साह नसणे.
अंग दुखणे, पाठ दुखणे. अशक्तपणा वाटणे.
कंबर दुखणे, थकवा येणे.
सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
**डॉ.सौ. उर्मिला गिते**
या सर्व तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
**अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह** बालिकाश्रम रोड, अ.नगर. मो. 9422740888

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 16 जानेवारी ते 23 जानेवारी 2025
MANGALA 02:15 PM
SANGEET MANAPMAA 0330P M
Y J Y D 0815 A M I 04:20 PM
JILBI 04:30 PM
GAME CHANGER 11:45 AM 06:50 PM
PUSHPA-2 10:00 PM
EMERGENCY 08:40 AM I 10:45 AM 01:30 PM I 07:45 PM 10:15 PM
AZAAD 0930 A M I 12:30 PM 07:00 PM I 09:45 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 17 JAN - 20 JAN 2025

गेम चेंजर 10.15AM
आझाद 12.00PM | 04.15PM 07.00PM | 08.00PM 10.45PM
इमर्जन्सी 09:30AM | 04.30PM 07.15PM | 10.30PM
पुष्पा - 2 The Rule Reloaded 12.10PM I 10.00PM
ये जवानी है दिवानी 09.00AM
सत्या 01.15PM
मुफासा (3D) Hindi 05.45PM
मंगला Marathi 03.00PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar.
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training
THE GREATEST EVER DISCOUNT OFFER
BIG DISCOUNT DAYS
9th to 18th Jan

Any Course Just in 1450/-
MS-OFFICE ADV. EXCEL TALLY GST | 2D CAD 3D CAD CORELDRAW PHOTOSHOP | ILLUSTRATOR IN DESIGN C PROGRAMMING C++ | CANVA CHAT GPT BANKING TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, A.agar 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, A.nagar. 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, A.nagar. 7447761769


## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर

मुख्य कार्यालय :- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर. फोन २३२६९१४

जा.क्र. पतसंस्था फेडरेशन / १२ / सन २०२५ दिनांक :- ०३/०१/२०२५

## स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा

ज्या अर्थी, **सहकारमहर्षि श्री. सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अ.नगर, ता.जि. अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुद्ध महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असून त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर. यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी **जे. डी. काळे** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जाहीर लिलावाने विक्री करीत आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी नमुद ठिकाणी तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा रक्कम | गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु पै | चतु:सिमा | | | |
| | | | | | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | कर्जदार - सुर्यकांत एकनाथ जायभाये करिता<br>जामि- खंडु दादाभाऊ कराडे यांची मिळकत<br>जामि - अशोक शिवाजी जाधव | मुकिंदपुर ता. नेवासा | ४०५७४९/-<br>+ होणारे व्याज<br>+ इतर खर्च | २३/४ | १.७६ | १.७७ | मुळ नकाशाप्रमाणे | | | |
| २ | कर्ज : मच्छिंद्रनाथ बन्सी गुंड करिता<br>जामि- विक्रम भाऊसाहेब शेळके यांची मिळकत<br>जामि- अजबे गिरीष पुंडलिक | नगर ता. नगर | १०९८७४७/-<br>+ होणारे व्याज<br>+ इतर खर्च | नगर भूमापन क्र. ६४३०/१, बेसमेन्ट शॉप नं.३ | ११.३०४ चौमी | -- | मुळ नकाशाप्रमाणे | | | |
| ३ | कर्जदार- कान्हु बजाबा सुंबे करिता<br>जामि- आसाराम भगवंत टिमकरे यांची मिळकत<br>जामि- दळवी पंढरीनाथ नाना | इमामपुर ता. नगर | ५४५८१७/-<br>+ होणारे व्याज<br>+ इतर खर्च | १३१ | ०.१० | ०.२९ | मुळ नकाशाप्रमाणे | | | |
| ४ | कर्जदार- अनिल कमलाकर देशपांडे करिता<br>जामि- जिवन मथुराप्रसाद दुबे यांची मिळकत<br>जामि- देशपांडे विजयकुमार कमलाकर | सावेडी ता. नगर | ६८७६३/-<br>+ होणारे व्याज<br>+ इतर खर्च | १२/४/१२/५/प्लॉट १ | ०.०७.२० | ५.२१ | मुळ नकाशाप्रमाणे | | | |
| ५ | कर्जदार- मे. रमा एंटरप्राईजेस करिता प्रो. रमला सुभाषलाल गांधी यांची मिळकत<br>जामि- वैभव मुरलीधर टाकळकर यांची मिळकत<br>जामि- रविकिरण सुभाषलाल गांधी | नगर ता. नगर | ८५१६९८/-<br>+ होणारे व्याज<br>+ इतर खर्च | न.भु.क्र. १०३ खरेदीने ३ रा मजला फ्लॅट नं. ३०२ | ४९.२६ चौमी | -- | मुळ नकाशाप्रमाणे | | | |
| ६ | कर्जदार- सय्यद मुबारक सजन करिता<br>जामि- पानमळकर सदाशिव बबनराव यांची मिळकत<br>जामि- शेख करीम आजमुद्दीन | बुऱ्हाणनगर ता. नगर | ५९१८४/-<br>+ होणारे व्याज<br>+ इतर खर्च | ५/१/१ | ०.०१.५० | ०.०२ | मुळ नकाशाप्रमाणे | | | |
| ७ | कर्जदार- शेख शफीराजमहंमद जहागीरदार यांची मिळकत<br>जामि- खांदवे रामदास नामदेव<br>जामि- खान समीर जब्बार | नगर ता. नगर | २३९९८/-<br>+ होणारे व्याज<br>+ इतर खर्च | न.भु.क्र. १०७७/१ पैकी | ४१.८ चौमी | -- | मुळ नकाशाप्रमाणे | | | |

**लिलावाचे ठिकाण व वेळ :** https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर **(सहकारमहर्षि श्री. सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अ.नगर, ता.जि. अ.नगर). दि. ०३/०२/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता.** हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व बँकेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल, याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

**लिलावाच्या दिवशी दि.** ०३/०२/२०२५ रोजी लिलावात कोणीही भाग न घेतल्यास **फेर लिलाव नं. २ दि. ०६/०३/२०२५ रोजी सकाळी : ११.३० वाजता** संस्थेच्या कार्यालयात होईल. तसेच या ही लिलावात बोली बोलण्यास अथवा योग्य किमंत न आल्यास **अंतिम लिलाव हा दि. ०७/०४/२०२५ रोजी सकाळी : ११.३० वाजता** https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर **(सहकारमहर्षि श्री. सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अ.नगर, ता.जि. अ.नगर)** या ठिकाणी होईल याची नोंद घ्यावी.

**(जे. डी. काळे)**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर

स्थळ :- अ.नगर
दिनांक :- ०३/०१/२०२५



**स्व. ॲड. प्रकाशलालजी बन्सीलालजी पोखर्णा**
जन्म दि. २५/६/१९४६ । स्वर्गवास दि. १८/१/२०१८

**७ वे पुण्यस्मरण...**

क्षणोक्षणी आमच्या मनी तुमचीच आहे आठवण,
हीच आमच्या जीवनातील अनमोल अशी साठवण..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली...

* दु:खांकित *
समस्त पोखर्णा परिवार (ढवळपूरीवाला)
मेहेर परिवार (आष्टीवाला)
गांधी परिवार (रस्तापूरवाला)
भळगट परिवार (वडाळावाला)
व समस्त मित्र परिवार